रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८६ | अंक २८० पृष्ठे ८ www.krushival.in

# कृषीवल

रायगड, रविवार दि. १९ मार्च २०२३

किंमत ४ ₹




## शहाबाजनजिक अपघात

**भाकरवड :** पोयनाडनजिक डंम्पर आणि क्लालिस यांची धडक होऊन सहाजण जखमी झाले. हा अपघात शनिवारी संध्याकाळी एका चायनिज सेंटरसमोर घडला. जखमी सर्वजण क्वालिसमधून प्रवास करीत होते. ते सर्व गेलचे कर्मचारी आहेत.



यामध्ये राजेश मंडल, गणेश भोईर, मोनीरुख काझी, कुशल चक्रवर्ती, माणिकचंद शेख, अबु सिद्धकी अशी जखमींची नावे आहेत. त्यांच्यावर जेएसडब्लूच्य संजिवनी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.या अपघाताची नोंद पोयनाड पोलिसात करण्यात आली.अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक महादेव जाधव,सुभाष सोनावणे,राज म्हात्रे आदी करीत आहेत.

### परप्रांतीय कामगाराकडून अतिप्रसंगाचा प्रयत्न

# चिंचोटी ग्रामस्थांचा मोर्चा

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

गेल कंपनीमध्ये कामावर असलेल्या एका परप्रांतीय कामगाराकडून चिंचोटी परिसरातील एका अल्पवयीन मुलीवर शुक्रवारी रात्री अतिप्रसंग करण्याचा घृणास्पद प्रकार घडल्याने या परिसरातील वातावरण तंग झाले. याच मुद्यावर चिंचोटी ग्रामस्थांनी शनिवारी (दि.१८) गेल कंपनीवर मोर्चा काढून ग्रामस्थांनी घटनेचा निषेध व्यक्त केला. जवळपास ४०० ते ५०० ग्रामस्थांनी मोर्चा काढून पोलिसांनी केलेला लाठीमार, परप्रांतियांमुळे गावातील महिलांची असुरक्षितता याबाबत तीव्र संताप व्यक्त केला. यावेळी चिंचोटी ग्रामपंचायतीच्या सदस्या देवयानी पाटील, संजय पाटील, ग्रामस्थ तसेच शेकापचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान या घटनेनंतर गेल प्रशासनाने मात्र सकारात्मक चर्चा केली. पान २ वर



(छायाचित्र– श्रेया फोटो)

ग्रामस्थांनी कायद्याचे उल्लंघन करु नये. या घटनेतील आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गावात शांतता व सुव्यवस्था रहावी यासाठी पोलीस कटिबद्ध आहेत. याबाबत सर्व ग्रामस्थांनी शांततेत प्रकरण हाताळणे गरजेचे आहे.

- देविदास मुपडे, पोलीस निरीक्षक, रेवदंडा पोलीस ठाणे

### खानावचे सरपंच अनुपस्थित

गेल ही कंपनी खानाव ग्रामपंचायत हद्दीत असून कंपनीतील परप्रांतीय कामगाराने केलेला गुन्हा अतिशय निंदनीय होता. त्यामुळे कंपनीवर काढण्यात आलेल्या मोर्चात लोकप्रतिनिधी म्हणून सरपंच अनंत गोंधळी यांनी उपस्थित राहणे अपेक्षित होते. त्यांच्या अनुपस्थितीमुळे ग्रामस्थांनी सरपंचांना बोलवा, तोपर्यंत चर्चा करणार नाही, अशी भूमिका घेतली. पोलिसांनी गोंधळी यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी सोयीस्कररित्या मुंबईत असल्याचा निरोप पोलिसांकडे दिला. त्यामुळे ग्रामस्थांनी निवडून दिलेल्या सरपंचांविरोधातही घोषणाबाजी करीत संताप व्यक्त केला.

### संपकरी शिक्षकांचा सवाल

# आ.म्हात्रे गप्प का?

। माधवी सावंत ।

। अलिबाग ।


शिक्षकांसाठी गेली आठ वर्षे झटणारे, जुन्या पेन्शन योजनेसाठी वारंवार जेलमध्ये गेल्याचेसांगणारेकोकण शिक्षक मतदारसंघाचे आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी गेल्या पाच दिवसांपासून सुरु असलेल्या संपाबाबत मौन बाळगल्याने आश्चर्य आणि संताप व्यक्त होत आहे.



रायगडसह कोकणातील शिक्षक संपात सहभागी असताना कोणताही पाठिंबा दर्शवित नाहीत. यावरुन आ. म्हात्रेंचे जुन्या पेन्शन योजनेबाबतचे पान २ वर

### शिक्षकांसाठी लढणार : बाळाराम पाटील

कोकण शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत पराभव पदरी पडल्यानंतरही आजतागायत पेन्शनसाठी अर्ज केला नाही. जोपर्यंत सरकारी, निमसरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू होत नाही, तोपर्यंत स्वतःचादेखील अर्ज भरणार नाही. सत्तेत नसलो तरी शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी कायम लढणार, असा निर्धार शेकाप नेते बाळाराम पाटील यांनी केला आहे.




## वेधक

### रजनीकांत यांची ठाकरेंसमवेत चर्चा

**मुंबई :** दक्षिणेतील सुपरस्टार अभिनेते रजनीकांत यांनी शनिवारी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. याआधी 'रोबोट' चित्रपटाच्या प्रमोशनसाठी मुंबईत होते, त्यावेळी त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांची त्यांच्या निवासस्थानी मातोश्रीवर भेट घेतली. ही सदिच्छा भेट होती. ही कुठलीही राजकीय भेट नव्हती, रजनीकांत हे बाळासाहेब ठाकरे यांचे निस्सीम चाहते आहेत. असे सांगण्यात आले.

### 'स्मारकाऐवजी वसतिगृहे बांधा'

**नाशिक :** लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्मारके न बांधता सरकारने ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतिगृहे बांधावीत अशी मागणी भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी केली आहे.नाशिक येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. गोपीनाथ मुंडे पुर्णाकृती पुतळ्याचं लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, आदींच्या उपस्थितीत पार पडलं. यावेळी पंकजा मुंडे यांनी माझी सरकारला विनंती आहे की, महत्त्वाच्या शहरात ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी वसतिगृह बांधा, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

## रायगड जिल्हा बँकेचा संपकरी शिक्षकांना दिलासा

### मिळणार बिनव्याजी ॲडव्हान्स वेतन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

संपूर्ण महाराष्ट्रात राज्य मध्यवर्ती संघटनेने बेमुदत कर्मचारी संप पुकारलेला असून, या संपात रायगड जिल्हा शिक्षक संघटना समन्वय समितीचादेखील सक्रिय सहभाग आहे. परंतु, या संपामुळे रायगड जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षक यांना ऐन मार्च महिन्याच्या लगबगीमध्ये वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक विभाग शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांनी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे



अध्यक्ष आ. जयंत पाटील यांच्याकडे शिक्षकांना बिनव्याजी ॲडव्हान्स वेतन मिळावे म्हणून विनंती केली. जयंत पाटील यांनी सदर संघटनेची विनंती मान्य केली असून, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी सदर सुविधा तात्काळ कार्यान्वित केली जाणार आहे, असे सांगितले. तसेच जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांना ही योजना २१ मार्च २०२३ पासून उपलब्ध असेल, अशी माहिती दिली आहे. याकरिता रायगड शिक्षक संघटना समन्वय समितीनेदेखील बँकेचे पान २ वर

## सहाआसनी चालकांच्या आंदोलनाला यश

### मुख्यमंत्र्याकडील बैठकीत अनेक प्रश्न मार्गी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

मागील काही महिन्यांपासून सुरू असलेल्या जिल्हयातील सहा आसनी रिक्षा चालकांच्या आंदोलनाला यश आले आहे. शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात झालेल्या बैठकीत अनेक समस्या मार्गी लागल्या असून अनेक मुद्यांवर सर्वमान्य तोडगा निघाला आहे.

विजय पाटील यांनी आत्मदहन करण्याचा इशारा देत शेकडो सहाआसनी रिक्षा चालकांनी अलिबाग येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. विजय पाटील यांचा आत्मदहनाचा प्रयत्न पोलीसांनी हाणून पाडला. त्याचवेळी शुक्रवारी (दि. १७) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात बैठक घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री सचिवालयाने दिले.

त्यानुसार ही बैठक पार पडली. संघटनेच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात सकारात्मक चर्चा झाली. प्रामुख्याने जिल्हयातील सहाआसनी रिक्षांची वयोमर्यादा सरसकट दोन वर्ष वाढवून देण्यास सहमती झाली. इको टॅक्सीला सीएनजी मान्यता मिळावी, व्यवसाय करातील चक्रवाढ व्याजातून सूट मिळावी, प्रत्येक टॅक्सी चालकाला १५०० रुपये कोरोना काळातील सानुग्रह अनुदान मिळावे, बदली वाहन करताना २५ हजार रुपये ऐवजी १० हजार रुपये फी आकारण्यात यावी. तीन चाकी सहा आसनी सीएनजी वाहनास मान्यता मिळावी. पान २ वर




## रायगडात ११४ गावांना अवकाळीचा फटका

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगडात गेल्या आठवडाभरात ठिकठिकाणी पडलेल्या अवकाळीचा फटका जिल्ह्यातील ११४ गावांना बसला आहे. जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयाने केलेल्या प्राथमिक पाहणी अहवालात जिल्ह्यातील २०७.३ हेक्टरातील विविध पिकांना याचा फटका बसला असून,बाधित शेतकऱ्यांची संख्या ८२५ इतकी आहे.

जिल्ह्यातत ९ ते १६ मार्च दरम्यान अवकाळी पाऊस पडला.या पावसाने आंबा,चिकू,कडधान्यांना मोठा फटका बसला.अलिबाग तालुक्यातील १२ गावामध्ये ३० हेक्टर क्षेत्रातील आंबा पिकांना याचा फटका बसला असून,तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांची संख्या ७५ इतकी आहे.याशिवाय पेण तालुक्यातील २९ गावातील २९ हेक्टर क्षेत्रात १६२ शेतकरी बाधित झाले.याच तालुक्यात कडधान्याचे ४ पान २ वर

## किसान मोर्चा माघारी

### शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य

। मुंबई । प्रतिनिधी ।

शेतकऱ्यांचा किसान लॉंग मार्च अखेर स्थगित करण्यात आला आहे. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकरी नेते जे.पी. गावित यांनी याबाबत माहिती दिली आहे.

वाशिंद, जि. ठाणे येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना गावित यांनी पान २ वर

### डॉ. नवलेंना डावलले

मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी सरकारने स्थापन केलेल्या समितीतून डॉ. अजित नवले यांना वगळण्यात आले आहे. मंत्री, मंत्रालयस्तरीय अधिकारी व शेतकरी प्रतिनिधी यांची समिती बनविली जावी, अशी मागणी किसान सभेच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यासोबत आ. विनोद निकोले, डॉ. अशोक ढवळे व कॉम्रेड जे.पी. गावीत यांनी लगेचच डॉ. अजित नवले यांचे नाव समितीत असावे, असे मुख्य सचिव यांना एकमताने व तात्काळ सांगितले होते. मात्र, शिंदे–फडणवीस सरकारने हा प्रस्ताव नाकारला आहे.



## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१९ मार्च**

१) श्री.शरदचंद्र कृष्णाजी ठोसर
अलिबाग,
१९ मार्च १९४२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**श्री. हिरालाल गांधी, योगेश्वर मेडिकल, अलिबाग**

# महाड क्रांतीभूमीत यंदा एकच विचारपीठ

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड या ऐतिहासिक भूमीत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समतेची ज्योत प्रज्वलित केली. या घटनेचा स्मृतिदिन गेली अनेक वर्ष साजरा केला जात आहे. मात्र याठिकाणी विविध पक्ष आणि संघटना वेगवेगळे तंबू ठोकून कार्यक्रम करत आहेत. यामुळे अनेकवेळा वादविवाद तर प्रचंड गोंधळाचे चित्र निर्माण झाले होते. महाड क्रांती भूमितून बाबासाहेबांनी सामाजिक समतेचा विचार देश आणि देशाबाहेर नेला. हाच सामाजिक समतेचा विचार एक मंचावर मांडण्याकरिता सन २०१८ मध्ये तरुण पिढी पुढे आली होती. मात्र कांही राजकीय वादामुळे हा विचार मागे पडला होता मात्र आता पुन्हा एकदा महाडमधील च्या माध्यमातून एक विचारपीठ उभे केले जाणार आहे.

सामाजिक क्रांतीचा स्मृतिदिन प्रतिवर्षी साजरा केला जातो. मात्र आंबेडकरी चळवळीतील विविध पक्ष, सामाजिक संघटना, धार्मिक संघटना हा कार्यक्रम आपापल्यापरीने महाड मध्ये साजरा



करतात. यामुळे या स्मृतिदिनाला देशभरातून आलेल्या भीम सैनिकांची मोठी पंचाईत होते. महाड मध्ये सालाबादप्रमाणे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, पीपल्स रिपब्लिकन पार्टी, भारिप बहुजन महासंघ, रिपब्लिकन सेना, या प्रमुख राजकीय संघटनाबरोबर अनेक गट तट आणि विविध सामाजिक संघटना आपापल्यापरीने अभिवादन कार्यक्रम आयोजित करतात. मात्र हे चित्र महाड क्रांतिभूमीमध्ये विचित्र दिसते. विविध ठिकाणी उभ्या केलेल्या तंबूमुळे ऐक्य दिसून येत नाही. यामुळे प्रशासनावर देखील प्रचंड ताण निर्माण होतो. स्थानिक तरुणानी याला बगल देण्याचे ठरवून सन २०१८ मध्ये सर्व नेत्यांनी आपला विचार एकाच मंचावर मांडावा अशी भूमिका घेतली होती. एक मंच एक विचारच एल्गार या तरुणांनी पुकारून २० मार्चला देशातील आंबेडकरी विचारांच्या नेत्यांनी आणि अनुयायांनी यामध्ये सहभागी होवून एक चांगला संदेश महाड क्रांतीभूमितून द्यावा अशी भूमिका मांडली होती. मात्र कांही राजकीय नेत्यांनी याला

### चवदार तळे स्मृतिदिनी विविध कार्यक्रम

विरोध करत स्वतंत्र मंडप उभे केले. यावर्षी मात्र क्रांतिभूमी संवर्धन समिती स्थापन झाली असून त्यामाध्यमातून क्रांतीस्थंभावर एकच मंडप उभा केला जाणार आहे. एकाच विचार मंचकावर सर्वच नेते एकाचवेळी उपस्थित राहणार नसले तरी पुढील वर्षी असा प्रयत्न केला जाईल अशी भूमिका समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली. यावेळी विनायक हाटे, रिपब्लिकन पार्टीचे मोहन खांबे, लक्ष्मण जाधव, प्रभाकर खांबे, आदी पदाधिकारी उपस्थित होते. समितीचे अध्यक्ष विनायक हाटे यांनी १९-२० मार्च रोजी निर्माण होत असलेल्या वातावरणावर नाराजी व्यक्त केली. स्थानिक प्रशासन कोणत्याही प्रकारचे नियोजन करत नाही. यामुळे देशभरातून येणाऱ्या महिलांचे हाल होत असतात. जागोजागी वाहतुकीचा प्रश्न निर्माण होतो. याशिवाय सामाजिक समतेचा विचार मांडण्यासाठी अनेक मंच याठिकाणी उभे राहतात आणि कोण काय सांगतोय हे कळत नाही. बाहेरून आलेल्या भिमसैनिकांचे यांचे विचार ऐकायचे का त्यांचे असा प्रश्न निर्माण होतो. कुठेतरी नियोजनबद्ध कार्यक्रमाची गरज आहे आणि महाड क्रांतीभूमितून एक चांगला विचार गेला पाहिजे या उदात्त हेतूने आम्ही काम करत असल्याचे सांगितले.

### समता मार्चचे आयोजन

**छत्रपती शिवाजी महाराज समाधी ते चवदार तळे समता मार्चचे आयोजन १९ मार्च रोजी देशाच्या विविध ठिकाणहून या कार्यक्रमाला लाखो भीमसैनिक दाखल होत असतात. १९ मार्च रोजी किल्ले रायगडावरून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीस्थळावरून महाडच्या चवदारतळे पर्यंत समता मार्च काढण्यात येणार असल्याचे देखील या तरुणांनी सांगितले. या समता मार्चचा समारोप चवदारतळे याठिकाणी होणार आहे. या मार्चमध्ये देखील मोठ्या संखेने सामील होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

# महिलांचा पाठलाग करून सोनसाखळ्या चोरणारा अटकेत

## ओला चालकाकडून अडीच लाखांचा ऐवज जप्त

**। पनवेल । वार्ताहर ।**

वयोवृध्द महिलांचा पाठलाग करून जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास मुंब्रा पोलिसांनी अटक केली. त्याच्या कडून अडीच लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. दिवा शहर परिसरात वयोवृध्द महिलांना टार्गेट करून त्यांचा पाठलाग करून सदर महिला राहत्या इमारतीमध्ये जिन्याने घरी जात असताना अनोळखी आरोपी हा त्यांच्या गळयातील सोन्याचे दागिने जबरीने खेचून पळून जात होता. अशाप्रकारचे १० ते १२ दिवसांमध्ये ४ चोरीच्या घटना घडल्याने सदर गुन्हेगारास अटक करून चेन स्नॅचिंग गुन्हयांना प्रतिबंध करणे व घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याचे मोठे आव्हान मुंब्रा पोलीसांसमोर होते.

मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन. बी. कोल्हटकर यांनी गुन्हयांच्या



घटनास्थळी भेट देवून सदर गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मुंब्रा व दिवा गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि शेळके, बोरसे व अमंलदार यांची दोन पथके तयार करून गुन्हेगाराची गुन्हे करण्याची पध्दत, गुन्हे करण्यासाठी वापरलेले वाहन तसेच इतर तांत्रिक व गोपनीय बातमीदारांच्या मदतीने आरोपी निष्पन्न करून त्यास अटक करणेबाबत वेळोवेळी मार्गदर्शन व पाठपुरावा केला. सदर पथकांनी ४ चेन जबरी चोरीचे गंभीर गुन्हे उघडकीस आणण्याकरिता अविरत परिश्रम करून दिवा, खर्डीगाव, मुंब्रा व शिळफाटा परिसरातील सुमारे ११० खाजगी व महानगरपालिकेचे सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे फुटेज संकलन केले. सदर सी.सी.टी.व्ही फुटेजचे बारकाईने निरीक्षण करून आरोपीने गुन्हयात वापरलेली मोटारसायकल व त्याचा जाण्या-येण्याचा मार्ग निष्पन्न केला. सदरचा आरोपी हा गुन्हे करून खर्डी गाव परीसरात जात असल्याचे आढळून आल्याने नमुद पथकांनी अहोरात्र सापळा लावून आरोपीस निर्मलनगरी खर्डी गाव येथून शिताफीने पाठलाग करून ताब्यात घेतले. कमलेश रामानंद गुप्ता (वय ३३ ) असून तो एक ओला चालक आहे. त्याला पोलिसांनी अटक केली.

पोलीस कोठडी दरम्यान आरोपीकडे केलेल्या कौशल्यपूर्ण तपासामध्ये त्याने ठाणे पोलीस आयुक्तालयातील चैन जबरी चोरीचे ४ गुन्हे व चोरीचे २ गुन्हे केल्याचे उघडकीस आले.

# जागावाटप सूत्रावरुन भाजप प्रदेशाध्यक्षांचे धूमजाव

**। मुंबई । प्रतिनिधी।**

आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप २४० जागा लढवणार आहे, असे विधान भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले होते. मात्र, आपल्याच विधानावर त्यांनी घुमजाव केले आहे. २८८ जागा भाजप-शिवसेना युती लढेल आणि २०० जागा जिंकेल, असा दावा बावनकुळे यांनी केला आहे. त्याचवेळी आपण बोललो त्याचे अर्धेच दाखविण्यात आले आहे, असे सांगून त्यांनी मीडियावर खापर फोडले आहे. बावनकुळेंच्या या विधानावरुन शिंदे गटाने तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शिवसेना आणि भाजप २८८ जागा युतीत लढणार आहे. एनडीए घटक पक्ष त्यातही असतील. आम्ही २०० जागा आम्ही जिंकणार आहोत. महाविजय २०२४ असेल. पूर्वी युतीला मिळाल्या नाही तेवढा मोठ बहुमत आम्हाला मिळेल. त्याच्या तयारीची आमची बैठक होती. मात्र, काही विपर्यास करुन क्लिप दाखवण्यात आली आणि त्यातील अर्धा भागच होता. २८८ जागा भाजपा-शिवसेना युती लढेल आणि २०० जागा जिंकेल, असे ते म्हणाले.

### बावनकुळेंना अधिकार कुणी दिले- शिरसाट

**चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वक्तव्यामध्ये दम नाही. बावनकुळे यांना एवढे अधिकार कोणी दिले, हे माहिती नाही? अशा वक्तव्यामुळे युतीमध्ये बेबनाव निर्माण होतो, याची जाणीव बावनकुळे यांना असायला पाहिजे,अशी टीका शिंदे गटाचे आ.संजय शिरसाट यांनी केली. आम्ही काय मुर्ख आहोत का फक्त ४८ जागा लढवायला? भाजप-शिवसेना जागावाटपासाठी वरिष्ठ पातळीवर बैठक होईल. त्या बैठकीत वरिष्ठ जो काही निर्णय घेतील त्यांना घेऊ दे. चंद्रशेखर बावनकुळे यांना हे अधिकार कोणी दिले? अशाने कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढते, असे संजय शिरसाट यांनी म्हटले.**

# लोणशीत इसमाचा आकस्मित मृत्यू

**। माणगाव। प्रतिनिधी।**

लोणशी,ता.माणगाव येथील एका रुपेश बाळाराम केकाणे (वय ४०) यांचा आकस्मित मृत्यू झाल्याची घटना घडली. वाजता घडली. दिनेश महीपत केकाणे व रुपेश बाळाराम केकाणे हे वणवा विझविण्यासाठी गेले होते.पण ते घरी न परत आल्याने त्यांची शोधाशोध केली असता रुपेश वणव्यापासून जवळच पाण्याच्या ओहळ किनारी बेशुद्ध अवस्थेत पडलेला दिसला. तसेच त्याचा डावा पाय भाजलेला दिसला. म्हणून उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे आणले. याठिकाणी रुपेशला आणल्यावर येथील डॉक्टरांनी त्यास तपासून मयत झाल्याचे सांगितले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पाचव्या दिवशीही कर्मचारी संपावरच

**। मुंबई । प्रतिनिधी।**

कारी कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाचा आजचा पाचवा दिवस असून मागणी पूर्ण होईपर्यंत संप कायम ठेवण्याचा इशारा राज्य सरकारला देण्यात आला आहे. दरम्यान, सरकारी कर्मचाऱ्यांनी पुन्हा कामावर रुजू व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संपकरी कर्मचाऱ्यांना केले आहे. संपामुळं सर्वसामान्य नागरिकांचे होत असल्याचे त्यांनी सुचित केले. मोठा फटका रुग्णसेवेला दरम्यान, कर्मचाऱ्यांच्या संपाचा मोठा फटका रुग्णसेवेला बसला आहे. मुंबईत रुग्णालयातील ओपीडी रुग्णसंख्येत घट दिसून येत आहे. जे.जे. मध्ये शुक्रवारी फक्त १६ शस्त्रक्रिया तर, तर जी.टी आणि सेंट जॉर्जेसमधील बहुतांश शस्त्रक्रिया रद्द करण्यात आल्या आहेत.

# डॉ सुहास माने यांना पितृशोक

**। अलिबाग।विशेष प्रतिनिधी।**

सेवानिवृत्त नायब तहसीलदार दत्तात्रय ज्ञानोबा माने (वय ८१) यांचे शुक्रवारी १७ मार्च रोजी सकाळी आजारपणामुळे निधन झाले. रायगडचे जिल्हा शासकीय रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ सुहास माने यांचे ते वडील होते. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे, एक मुलगी, सूना व नातवंडे असा परिवार आहे. सातारा टपाल कार्यालयातील अधिकारी सतीश माने हे त्यांचे पूत्र होत.



पान १ वरुन

## चिंचोटी ग्रामस्थांचा मोर्चा

चिंचोटी गावच्या रस्त्यावर एका अल्पवयीन मुलीवर गेल कंपनीत कामावर असलेल्या परप्रांतीय तरुणांनी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. शुक्रवारी रात्री हा प्रकार घडला. सुदैवाने वेळीच तिने आरडाओरडा केला आणि गावकरी घटनास्थळी पोहचले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. संतप्त गावकऱ्यांनी त्यातील एका आरोपीला चांगलाच चोप दिला. यावेळी पोलिसांनी ग्रामस्थांवर लाठीचार्ज केला. त्यामुळे संतापलेल्या ग्रामस्थांनी शनिवारी सायंकाळी कंपनी गेटवर मोर्चा काढला. तसेच पोलिसांना चांगलेच धारेवर धरले. दरम्यान या घटनेचा तपास पोलीस उपअधिक्षक सोनाली कदम यांच्याकडे देण्यात आला आहे.

**नेमकं काय झालं?**

वावे येथून एक अल्पवयीन मुलगी चिंचोटी येथे आपल्या गावी चालत जात होती. ती ज्या रस्त्याने जात होती, त्या मार्गावर निर्जन ठिकाणी आरोपींनी तिला रस्त्याच्या बाजूला शेतात ओढत नेले. तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. तिने विरोध केला म्हणून ओढणीने तिचा गळा दाबण्याचा देखील प्रयत्न केला. सुदैवाने या मार्गावरून एक वाहन गेले. त्याच्या प्रकाशाने घाबरून दोघे पळाले. त्या मुलीने आरडाओरडा केल्याने काही लोकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि आरोपीला पकडले. गावातील मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्या तरुणाला संतप्त जमावाने चांगलाच चोप दिला. या घटनेमुळे चिंचोटी आणि पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. जमाव प्रचंड संतापला होता. गेल कंपनीच्या ज्या कंत्राटी ठेकेदाराकडे परप्रांतीय असलेला आरोपी काम करतो. या ठेकेदाराला बोलवा, त्याशिवाय आरोपीला घेऊन जाऊ नये, असा पवित्रा गावकऱ्यांनी घेतला. वातावरण चांगलेच तापले होते. पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांनी घटनास्थळी भेट दिली.

**लाठीमारावर गावकरी नाराज**

या घटनेची खबर सर्वत्र पसरली आणि गावकरी घटनास्थळी धावले. वातावरण चांगलेच तापले होते. गावकरी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्या परप्रांतीय तरुणाच्या ठेकेदार मालकाला बोलवा, ही एकच मागणी होती. यावेळी पोलिसांनी लाठीमार केल्याचे गावकऱ्यांनी कृषीवलसोबत बोलताना सांगितले. या लाठीमारामध्ये पीडित मुलीच्या वडिलांना देखील मार बसला. चिंचोटी येथील ही घटना रात्री ८ च्या सुमारास घडली. पहाटे साडेचारच्या सुमारस आरोपीवर गुन्हा दाखल झाल्याचे सांगण्यात येते. रात्रभर या घटनेमुळे रेवदंडा पोलीस ठाण्यात गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**परप्रांतीयांची माहिती कोणाकडे?**

नोकरी आणि कामासाठी परजिल्ह्यातील कामगार अलिबाग तालुक्यातील गावागावात मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. कंत्राटी पध्दतीवर मिळेल ते काम ते करतात. एकतर कामाच्या ठिकाणी झोपडी बांधून रहातात. नाहीतर गावात भाड्याच्या खोलीत रहातात. विशेष म्हणजे, त्यांच्या ओळखीचे किती दाखले, घरमालक तपासून घेतात? हा प्रश्न आहे. ठेकेदार देखील त्यांची शहानिशा करतात का? अशा मजुरांची माहिती ते गावातील ग्रामपंचायत, पोलीस पाटील, पोलीस ठाणे येथे देतात का? या सर्वांची चौकशी व्हावी, अशी मागणी मोर्चात ग्रामस्थांनी केली.

**परिसरात पोलीस चौकी उभारा**

जोपर्यंत ग्रामस्थ, कंपनी प्रशासनाचे अधिकारी तसेच कंत्राटदार यांच्यात चर्चा होत नाही तोपर्यंत कंपनीचे काम बंद करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. तसेच कंपनीच्या हद्दीत पोलीस चौकी उभारण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

## आ. म्हात्रे गप्प का ?

त्यामुळे म्हात्रे यांचे मिशन किती खरे होते असा सवाल काहीजणांनी नाव न घेता उपस्थित केला आहे. निवडणूक तोंडावर येताच अनेक उमेदवार जाहीरनामा प्रसिद्ध करतात. त्याप्रमाणे आ. म्हात्रे यांनी जुन्या पेन्शन योजनेचा मुद्दा जाहीरनाम्यात प्रसिद्ध केला. शिक्षकांच्या पेन्शनचा प्रश्न सोडवणार असल्याचा निर्धार त्यांनी केला होता. मात्र, प्रत्यक्षात विजय मिळविल्यानंतर जुन्या पेन्शन योजनेचे मिशन ते सोयीस्कररित्या विसरल्याचा आरोप शिक्षकांनी केला आहे.

राज्यात भाजप-शिंदे गटाची सत्ता असतानाही अनेक शिक्षकांवर संपात सहभागी झाल्याबाबत कारवाईची टांगती तलवार ठेवण्यात आली आहे. निवडणुकीदरम्यान मते मिळविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जुन्या पेन्शन योजनेबाबत सकारात्मक असल्याचे सांगितले होते. तसेच आपण पूर्वी शिक्षक होतो असे म्हात्रे यांनी प्रचारात वारंवार सांगितले होते. त्यामुळे म्हात्रे यांचे पारडे जड झाले. मात्र, निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर शिक्षकांचे आ. म्हात्रे कुठे गायब झाले, गेल्या वर्षांपासूनचा त्यांचा लढा संपुष्टात आला का, शिक्षकांसाठी लढणं त्यांनी थांबविलं का, असे अनेक प्रश्न शिक्षकांनी उपस्थित केले आहेत.

आ. म्हात्रे यांनी विजयी झाल्यानंतर शिक्षकांच्या समस्या सोडविणे अथवा त्या सरकारसमोर मांडणे अपेक्षित होते. मात्र, म्हात्रे यांनी संपात सहभागी झाल्यानंतरही शिक्षकांबाबतची भूमिका विधानभवनात वा बाहेर ठळकपणे मांडली नसल्याचे दिसते. त्यामुळे कोकणातील शिक्षकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

**आ. ज्ञानेश्वर म्हात्रेंचा जाहीरनामा**

राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू व्हावी म्हणून गेल्या आठ वर्षांपासून सतत आंदोलन करीत आहे. आंदोलनात अनेकदा अटकही करण्यात आली. कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना मिळावी, म्हणून अहोरात्र मेहनत करुन जोपर्यंत जुनी पेन्शन योजना लागू होत नाही, तोपर्यंत गप्प बसणार नाही. कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना मिळवून देणारच, असे आ. म्हात्रे यांनी जाहीरनाम्यात म्हटले होते.

**अधिवेशनात गप्प का; शिक्षकांचा सवाल**

निवडणुकीत मोठमोठी आश्वासने देणारे आ. म्हात्रे यांनी संप काळात रस्त्यावर उतरलेल्या शिक्षकांची बाजू अधिवेशनात का मांडली नाही, असा संतप्त सवाल शिक्षकांनी उपस्थित केला आहे. अनेक शिक्षकांनी तर चुकीच्या उमेदवाराला सहकार्य केल्याची भावनाही नाव न सांगण्याच्या अटीवर व्यक्त केली.

## मध्यवर्ती बँकेचा शिक्षकांना दिलासा

आभार मानले आहेत.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी यावेळी आपली प्रतिक्रिया देताना सांगितले की, बँकेने गतवर्षी दिवाळीमध्येदेखील सदर सुविधा शिक्षक खातेधारकांना तात्काळ उपलब्ध करून दिली होती. त्यावेळी बँकेचे अध्यक्ष आ. जयंत पाटील तसेच सर्व संचालक मंडळ यांनी तात्काळ या योजनेला मान्यता देऊन बँकेच्या प्रत्येक शाखाधिकारी यांनी शिक्षक ग्राहकांशी संपर्क साधून अनेकांना ही सुविधा उपलब्ध करून दिली होती.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आपल्या पगारदार खातेधारकांसाठी ॲडव्हान्स वेतन, खातेधारकांचा विमा, मोबाईल ॲप, शिवाय फोन पे, गुगल पे यांच्या माध्यमातून पैसे ट्रान्सफर करण्याच्या अत्याधुनिक सेवा सुरू केल्याने आणि गरजेला मदत करण्याच्या ग्राहककेंद्रित धोरणामुळे शिक्षक खातेदार वर्ग मोठ्या प्रमाणावर रायगड जिल्हा सहकारी बँकेशी जोडला गेला आहे, याचे श्रेय अर्थातच बँकेचे अध्यक्ष आ. जयंत पाटील आणि संचालक मंडळ यांचे निर्णय तसेच शाखेतील कर्मचारी यांनी दिलेली उत्कृष्ट ग्राहकसेवा याला जाते, असे यावेळी मंदार वर्तक म्हणाले. शिवाय ॲडव्हान्स वेतन सुविधेचा लाभ बिनव्याजी असून, तो जिल्ह्यातील सर्वच शिक्षक खातेधारकांना होणार आहे. त्यामुळे अधिकाधिक शिक्षक खातेधारकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही वर्तक यांनी केले आहे.

## चालकांच्या आंदोलनाला यश

नवीमुंबई परीवहन सेवेच्या कर्जत, खोपोली, रसायनी ,पनवेल ,येथे सुरु असलेल्या बसेसच्या फेर्या कमी करण्यात याव्यात, सर्व सहाआसनी रिक्षा स्टॅन्ड अधिकृत करण्यात यावेत अश्या अनेक विषयावर सकारात्मक चर्चा करत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रायगड जिल्हा संघटनेच्या मागण्या रास्त असून लवकरात लवकर या मागण्या होण्यासंदर्भात आदेश दिले.

बैठकीला मंत्री दादा भुसे, प्रधान सचिव परिवहन, मुंबई प्रादेशिक परिवहन प्राधिकरण अध्यक्ष, परिवहन आयुक्त,जिल्हाधिकारी रायगड, पोलीस अधीक्षक रायगड, उपयुक्त परिवहन, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, आ. भरत गोगावले, रायगड जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय पाटील, संदेश धुवाली, कार्याध्यक्ष प्रमोद पाटील, सुधाकर यादव, शेखर राखाडे, दिपक नावडेकर, दिपक म्हात्रे उपस्थित होते.

## ११४ गावांना अवकाळीचा फटका

हेक्टर क्षेत्रातील १६ शेतकऱ्यांचे अवकाळीने नुकसान झाले.कर्जत तालुक्यात आंबा १४० हेक्टर आणि चिकू फळाचे साडेतीन हेक्टर क्षेत्र बाधित झाले.याचा फटका५७२ शेतकऱ्यांना बसला.असे एकूण ८२५ शेतकरी या अवकाळीने बाधित झाल्याची प्राथमिक माहिती कृषी विभागाने दिलेली आहे.

## शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य

आम्हाला सरकारने शिष्टमंडळ घेऊन बोलावलं आणि आमच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. ७० टक्के मागण्या महाराष्ट्र सरकारने मान्य केल्यात. बाकीच्या मागण्या विचाराधीन असल्याचे नमूद केले.

इथे आलेल्या लोकांना विश्वासात घेऊन आंदोलन मागे घ्यायचं की नाही हे ठरवलं होतं. बैठकीत जे निर्णय झाले, त्याची प्रत ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आमच्याकडे सुपूर्द केलेली आहे. मागण्या मान्य झाल्याने मोर्चेकरी समाधानी आहेत. ज्या मागण्या विचाराधीन आहेत, त्या येत्या काही दिवसांत नक्कीच पूर्ण होतील, असा विश्वासही गावित यांनी व्यक्त केला आहे.

शेतकऱ्यांचा मोर्चा नाशिकहून ठाणे जिल्ह्यातील वाशिंद येथे पोहोचल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तातडीनं सूत्र हलवण्यास सुरुवात केली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचंही त्यांना आश्वासन दिलं. शेतकऱ्यांनी उत्पादन केलेल्या मालाला चांगला भाव मिळाला पाहिजे, सातबारा उतारा कोरा केला गेला पाहिजे,

नुकसानीनंतर शेतकऱ्यांना तातडीने पीकविमा मिळाला पाहिजे, अवकाळी पावसाने होणाऱ्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून त्याची भरपाई मिळाली पाहिजे, अशा अनेक मागण्यांसाठी शेतकऱ्यांचा विराट मोर्चा नाशिकहून ठाण्यात आला होता. आता तो मोर्चा स्थगित करण्यात आला आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **सर्व प्रकारची विवाहस्थळे/** कर्जे/आजारपण/संतानप्राप्ती/गुंतवणूक एकालाखावर दरमहा ३०००/- आगाऊचेक डॉ.नथुराम शिहू/रायगड(पोयनाड/नागोठणा रोडवर) वेळ ठरवूनच. ७५०७१६६०१५
- **सर्व प्रकारच्या बॅगाचे** A to Z Materials Ready Bags/Purses आणि Automatic Motar Winding Machine अत्यंत वाजवी दरात त्वरीत विकणे आहे. Contanct - 9226379844
- **नागाव येथील हॉटेलमध्ये** अनुभवी माणूस कामाला पाहिजे १.ऑल राऊंडर कूक,२.हेल्पर कूक ३.कॉन्टिनेन्टल कूक (commi I) ४. किचनमध्ये काम करण्यासाठी लेडीज संपर्क: ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- **सिद्धाई टिफिन सेवा** घरपोच किंवा ऑफिसमध्ये मंथली टिफिन सेवा उपलब्ध. संपर्क - ८००७१९०३५२/८५५२८२७७२७.
- **शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग** शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी सुरू ४४ शाखा वेबसाईट - ९२२६७६६१२९
- **बोअरवेल -विहिरीसाठी** मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन - ९२२६७६६१२९
- **ऑटोकॅड, इन्टीरिअर डिझायनिंग, कॉम्पुटर** Programing :-C and C++, C#,Java, HTML, Vb.(Dot) Net, ASP. (Dot) Net. DTP, Tally etc. शिकण्यासाठी विश्वसनीय संस्था कॉलेज ऑफ आय.आय.टी.अलिबाग. प्रवेशासाठी पात्रता १२ वी पास कोणतीही शाखा, तसेच.. Draughtsman,ITI,Diploma,Civil, Mechanical, Electrical Etc.कोर्सेस करीतअसलेले विद्यार्थी. * ऑटोकॅड, इन्टीरिअर डिझायनिंग शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळवण्यासाठी१००%सहकार्य. प्रवेश चालू आहेत ..प्रवेशा साठीसंपर्क :- कॉलेज ऑफ आय. आय. टी. अलिबाग.जुन्या नगरपालिकेसमोर फोन 9970666369 , 7387893327.
- **पाहिजेत, प्लंबर, हेल्पर, फिटर** संपर्क : हजारे एन्टरप्रायजेस, अलिबाग- ९८२२००१८५३
- **नोकरीची संधी-** समुद्रावर मोमोजच्या गाडीवर (फुडकार्ट) काम करण्यासाठी माणसाची गरज आहे. इच्छुकांनी खालील फोन नंबरवर त्वरीत संपर्क साधावा. संपर्क- ९९७००५१८७६, ७९७७८६२३०७.

**जाहिरातीसाठी संपर्क**
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

निवडक

## सोन्याच्या गंठणाची चोरी

**पनवेल** : पनवलेजवळील नावडे गावाच्या बस स्टॉपवर मीरा घरत (५७) या रिक्षाची वाट पाहात उभ्या होत्या. दरम्यान, त्यांच्या गळ्यातील ८० हजार रुपये किमतीचे सहा तोळे वजनाचे गंठण काळ्या रंगाच्या बुलेटवरून आलेल्या चोरट्यांनी खेचून ते पसार झाले. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. दिवसेंदिवस वाढत्या सोनसाखळी चोऱ्यांच्या घटनांमुळे परिसरातील महिलांमध्ये घबराट निर्माण झाली आहे.

## चाकूहल्ला करणारा गजाआड

**पनवेल** : दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने सोनारावर चाकूहल्ला करून दागिने घेऊन पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या सुखविंदर जसबीरसिंग धामी (३२) या लुटारुला जागरुक नागरिकांनी पकडल्याची घटना पनवेलजवळील खांदा वसाहतीमध्ये घडली आहे. मुकेश जैन यांचे खांदा कॉलनीत विजयश्री नावाचे ज्वेलर्स दुकान आहे. आरोपी जैन यांच्या दुकानात दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने गेला होता. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## पनवेल येथे महिला बेपत्ता

**पनवेल** : पनवेल रेल्वे स्टेशन पार्किंग समोरील झोपडपट्टीत राहणारी जिलू गोविंद सलाड (२२) ही महिला कोणास काही एक न सांगता निघून गेली आहे. त्यामुळे ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तिची उंची ४ फूट, रंग सावळा, डोक्यावरील केस काळे लांब, नाक सरळ, गळ्यात साधे मंगळसूत्र असून, तिला बंजारा व हिंदी भाषा अवगत आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे ०२२-२७४५२३३३ येथे संपर्क साधावा.

## दोन लाखांची फसवणूक

**पनवेल** : तळोजा औद्योगिक वसाहतीमधील कंपनीत कामावर असताना दत्तात्रय शेडगे याची एका अज्ञात इसमाने फोन करून त्यानंतर त्यांचे गुगल पे हॅक केले. दरम्यान, त्यांच्या बँकेतील बचत खात्यातून दोन लाख ९ हजार ९९९ रुपये काढून घेऊन त्याची फसवणूक केल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत असून, नागरिकांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## वर्षा जांबेकरांना पुरस्कार

**कोलाड** : रोहा तालुक्यातील आमडोशी येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा बँक सखी वर्षा वासुदेव जांबेकर यांना गुरुवार, दि.१६ मार्च रोजी परशुराम बाग, पेण येथे भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा, दक्षिण रायगड यांच्या तर्फे स्व. सुषमा स्वराज पुरस्कार प्रदान करण्यात आला. वर्षा जांबेकर या बँक सखी म्हणून काम करीत असून, धार्मिक, अध्यात्मिक कार्यक्रमात त्या नेहमी सक्रिय असतात. त्यामुळे या कार्याची दखल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# बाजारात मासळीचा ठणठणाट

**■ आवक कमी झाल्याने दर वधारले ■ मत्स्यदुष्काळामुळे होड्या लागल्या किनारी**

**। मुरुड जंजिरा। वार्ताहर।**

**डोक्यावर आग ओकणाऱ्या सूर्यामुळे वाढती गर्मी, खोल समुद्रात मासळीचा दुष्काळ, कमी प्रमाणात मासे मिळत असल्याने आवक कमी झाली आहे. त्यामुळे मासळीचे भाव वधारले आहेत. ६०० ते ८०० रुपये किलोने मिळणारे पापलेट, सुरमई व रावस आदी मासळी आता १२०० ते १५०० रुपये किलोने मिळत आहे. खवय्यांना मासळीविना करमत नसल्याने त्यांच्या खिशाला चांगलीच झळ बसत आहे. ही मासळी खरेदी करणे सर्वसामन्यांच्या आवाक्याबाहेर झाले आहे. मासळी विक्री करताना विक्रेत्यांची दमछाक होत असून, नेहमीचे ग्राहक आणि चढा भाव यामुळे मोठी अडचण निर्माण होत आहे.**



दरम्यान, समुद्रात मासळी मिळत नसल्याने मुरूडच्या मासेमारी नौका किनाऱ्यावर नांगरून ठेवण्यात आल्या आहेत. मुरूडच्या मार्केटमध्ये काही प्रमाणात अलिबाग, रेवदंडा येथील मासळी येत असल्याचे शनिवारी दिसून आले. बऱ्याच दिवसांपासून येथे अशीच परिस्थिती आहे. मासळी गायब झाल्याने मच्छिमार हवालदिल झाले आहेत. बाहेरगावाहून येणारी मासळीचे भाव गगनाला भिडले असून, एका पापलेट मासळीच्या जोडीचा भाव १२०० ते १५००/- रुपये इतका असल्याचे मार्केटमध्ये फिरताना दिसून आले. सर्वसामान्य ग्राहकांना पापलेट खरेदीचा विचार करणेदेखील अवघड बनले आहे. मार्केटमध्ये बांगडे, कोलंबी, रावस, काटेरी मासळी, मांदेली अशी मासळी उपलब्ध होत असून, याचे प्रमाण फक्त ३० टक्केच होते.

मुरूडच्या समुद्रात किंवा आजूबाजूच्या खाडीपट्टीत मासळीचे दुर्भिक्ष्य असून, 'खामदे' गावची येणारी सफेद कोलंबीदेखील विक्रीस येत नाही. मुरूड तालुक्यातील पारंपरिक मासेमारी पूर्णपणे ठप्प असून, मच्छिमारांची आर्थिक परिस्थिती हाताबाहेर जाण्याचे दिसून येत आहे. ताज्या मासळीची उपलब्धता नसल्याने आलेल्या पर्यटकांचा हिरमोड होताना दिसत आहे. उपलब्ध मासळीचे दर अटकेपार असल्याने अनेकांना अखेर चिकनकडे वळावे लागत आहे. अवकाळी वादळी पावसाच्या संकटाचा सामना करणेदेखील मुश्कील बनले आहे. शनिवारी मार्केटमध्ये फक्त दोन ते तीन ठिकाणी काही पापलेट जोड्या दिसून आल्या; परंतु भाव आवाक्याबाहेर होते. कोळी मच्छिमार मंडळींवर मिळेल ती मासळी घेण्यासाठी मार्केटमध्ये यावे लागत असल्याचे एकदरा येथील हनुमान मच्छिमार सहकारी सोसायटीचे चेअरमन पांडुरंग आगरकर यांनी शनिवारी बोलताना सांगितले.

## नंदकुमार मरवडेंना पुरस्कार प्रदान

**कोलाड** : रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी या गावचे सुपुत्र तथा आदर्श शिक्षक नंदकुमार विठोबा मरवडे यांना राज्यस्तरीय अष्टपैलू काव्यभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अष्टपैलू संस्कृती कला अकादमी मुंबई यांच्या वतीने नुकत्याच आळंदी येथे संपन्न झालेल्या संस्थेच्या कार्यक्रमात त्यांना संस्थेचे संस्थापक शिवाजी खोरे यांच्या उपस्थितीत त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.






■ बेलोशी-महाजने येथे देवीच्या पालखी सोहळ्यास शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी उपस्थित राहून देवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी घरगुती गाठीभेटीही घेतल्या.

## डॉ. बाबासाहेबांना देणार मानवंदना

**। महाड । प्रतिनिधी।**

महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना चवदार तळे सत्याग्रह दिनी रायगड पोलिसांकडून महाडमध्ये सशस्त्र मानवंदना दिली जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचे आदेश दिल्याची माहिती महाडचे आमदार भरत गोगावले यांनी दिली.

सत्याग्रहदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सशस्त्र मानवंदना देण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष अमित गायकवाड यांनी केली होती. त्याचप्रमाणे आंबेडकरी



जनतेतर्फेदेखील सातत्याने ही मागणी केली होती. आ. भरत गोगावले यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे या मागणीचा पाठपुरावा करुन ही मागणी मान्य करुन घेतली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे आंबेडकरी जनतेमध्ये आनंदाचे वातावरण पहावयास मिळत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून ही मागणी आंबेडकरी जनतेकडून केली जात होती. ती मागणी मान्य करुन घेण्यात आपल्याला यश आले याचा विशेष आनंद होत असल्याची प्रतिक्रिया आ. भरत गोगावले यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



## मुरुडमध्ये आंदोलकांचा तंबू रिकामा

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तहसीलदार कार्यालयासमोरील प्रांगणात १४ मार्चपासून सर्व कर्मचारी आपल्या विविध मागण्यांकरिता संपावर गेले होते. परंतु, आज आंदोलनासाठी तहसील कार्यालयासमोर उभारण्यात आलेला तंबू रिकामा दिसला. याठिकाणी एकही कर्मचारी उपस्थित नसल्याने संप मिटला का, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला असून, चर्चेला उधाण आले आहे. दुसरीकडे नगरपरिषद कर्मचारी संपात सहभागी असल्याचे चित्र आहे. मग संपात फूट पडली की काय, याविषयी उलटसुलट चर्चा नागरिकांमध्ये होताना दिसून येत आहे.

## शुभम उगले प्रथम


**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जतचा शुभम शैलेश उगले कॉलेज ऑफ फूड टेक्नॉलॉजी, सरळगाव येथे शिक्षण घेत होता. त्याने बी.टेक (फूड टेक्नॉलॉजी) विद्या शाखेत डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे.



शुभम उगले हा कर्जत शहरातील म्हाडा वसाहतीत राहात असून, त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कर्जत एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये झाले. त्याला १० वीला ९३ टक्के, तर बारावीच्या विज्ञान शाखेत ८५ टक्के गुण मिळाले होते. त्यानंतर त्याने कॉलेज ऑफ फूड टेक्नॉलॉजी, सरळगाव-मुरबाड येथे शिक्षण घेतले. त्याने बी. टेक ( फूड टेक्नॉलॉजी) विद्या शाखेत डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला.



# सरकारी कर्मचाऱ्यांचा संपात सहभाग



। नेरळ । वार्ताहर ।

तालुक्यात जुनी पेन्शन योजनेसाठी महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी यांनी पुकारलेल्या संपाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. संपाच्या सहाव्या दिवशी शनिवारची सुट्टी असताना देखील असंख्य सरकारी कर्मचाऱ्यांनी कर्जत कचेरीवर हजेरी लावली आहे.

तालुक्यातील ७००-८०० कर्मचारी जुनी पेन्शन योजना लागू व्हावी यसाठी संपात सहभागी झाले आहेत.

तहसील कार्यालयाच्या परिसरात असलेल्या जिल्हा परिषद उपअभियंता कार्यालय येथे हे सर्व कर्मचारी गेली पाच दिवस आंदोलन करीत आहेत.

या संपामध्ये कर्जत तालुक्यातील महसूल कर्मचारी महासंघ,महसूल तलाठी मंडळ अधिकारी कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र जिल्हा परिषद कर्मचारी संघटना, नगरपरिषद नगरपालिका कर्मचारी युनियन, जुनी पेन्शन हक्क संघटना,महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य शिक्षक भारती, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना यांचे प्रतिनिधी संपामध्ये सहभागी झाल्या आहेत.

या सर्व संघटना यांची कार्यकारी मंडळ म्हणून समन्वय समिती काम करीत आहे.त्यात भगवान घरात, विजय जगताप,निलेश दामले, गोवर्धन माने, मिलिंद धाटावकर, मनोहर भोसले, विनय मोरे, संतोष जांभळे, समीर येरूनकर,राहुल गायकवाड, दिलीप घुले, दादाभाऊ मोहिते,योगेश्वर निकम आदी एकत्र येवून सर्वांमध्ये समन्वय साधण्याचे काम करीत आहेत.

हा बेमुदत संप असल्याने शनिवार रविवारी या सुट्टीचे दिवशी देखील संप सुरूच ठेवण्याचे समन्वय समितीने जाहीर केले आहे.

# जाहिरात फलकाची पडझड

। पनवेल । वार्ताहर ।

परिसरात गुरुवार (ता. १६) सायंकाळी झालेल्या अवकाळी पावसामुळे सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे कळंबोली सर्कलवर नियम धाब्यावर बसवून उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकाची पडझड झाल्याचे पाहायला मिळाले आहे.

पीडब्ल्यूडी विभागाच्या जागेत परवानगी न घेताच उभारण्यात आलेल्या या फलका खालून विविध कंपन्याच्या गॅस वाहिन्या टाकण्यात आलेल्या असताना गॅस कंपन्याचा ना हरकत परवाना न घेताच हा जाहिरात फलक उभारण्यात आलेला असल्याने पालिकेच्या परवाना विभागाने नुकताच हा फलक उभारणाऱ्या कंपनीला नोटीस बजावली होती. मात्र पालिकेच्या नोटीसला केराची टोपली दाखवत महामार्गाच्या अत्यंत कडेला उभारण्यात आलेल्या या जाहिरात फलकाची सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पडझड झाल्याने भविष्यात या ठिकाणी घटनेची पुनरावृत्ती होऊन एखादा अपघात होण्याची शक्यता आहे.




# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


# रानमेवा संकटात



। पाताळगंगा । वार्ताहर ।

अवकाळी पावसाने तालुक्याच्या ठिकाणी हजेरी लावली असल्यामुळे जंगलातील रानमेवा तयार होत असताना या अवकाळी पावसाचा फटका आदिवासी समाजाला बसला आहे.
हाच रानमेवा आदिवासी जनतेच्या उपजिविकेचे साधन होते. मात्र अवकाळी पावसामुळे त्यांच्या उपजिविकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. सध्या आंब्यांना छोट्या कैऱ्या लागायला सुरू झाली होती. वादळी वारे आणि या पावसामुळे कैऱ्या खाली पडल्या आहेत. डोंगरांची असलेली काळी मैना आता तयार होत असल्याने अवकाळी पावसाने आदिवासी उपजिविकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# नेत्रतपासणी शिबिराला प्रतिसाद

। खारेपाट । वार्ताहर ।

तालक्यातील आवास ग्रामपंचायत व डॉ. स्वेतलानातोष्णीवाल डी. एन. बी. (ओपीएच ) आयरीझ क्लिनीक मुंबई, व डॉ. प्रियांका डॉक्टर यांच्या संयुक्त विद्यमानाने आवास येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरास आवास व पंचक्रोषीतील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. सदर नेत्रतपासणी शिबिराकरिता डॉ. स्वेतलाना तोष्णीवाल, डॉ. प्रियांका, कुलसुम खान, कौसर राय,अमित चौरासिया, विशाल सिंग, निधी शेठ, लवकुश गिरी आदि सर्व डॉक्टर व त्यांच्या सहकार्यांचे मोलाचेसहकार्य लाभले. शिबीर यशस्वी करण्यासाठी अभिजित राणे, पुजा राणे, सुधिर राऊळ, सुधाकर राणे, राजेंद्र वाकडे, सुहासिनी राणे, प्रगती थळे, श्वेता वाकडे, ज्योती पवार, सोनाली माने, निधी भगत तसेच आवास ग्रामस्थांचे व महिला वर्गाचे मोठे सहकार्य लाभले.



# वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद

-मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसिने सर्वांना कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-नसरापूर, ता.कर्जत जि.रायगड, येथील खालील वर्णनाची अंकुश नाना मोहिते व भरत नाना मोहिते यांचे नावे दाखल असलेली स.न.७/२७ ही शेतीस्वरूपातची जमीन मिळकत कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तिचे रेव्हेन्यू रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे - नसरापूर, ता.कर्जत,जि.रायगड येथील मिळकत**

| अ.क्र. | स.नं./ग.न. | क्षेत्र हे.आर. | आकार |
|---|---|---|---|
| १ | ७/२७ | ०.१७.० | ०.१९ |

वरील तदंगभूत हक्कहितसंबंध सुद्धा

तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोडपत्र, बक्षीस, फारोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यांसह लेखी हरकत दाखल करण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे आशिल सादर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

खरेदीदारातर्फे वकील
**अॅड. संदिप हरिश्चंद्र मसणे**
कोर्ट व्ह्यू बिल्डिंग पहिला मजला
फ्लॅट नं.१०१, कर्जत दिवाणी कोर्टा समोर, कर्जत ता.कर्जत जि.रायगड

## जाहीर नोटीस

दि.१९/०३/२०२३

तमाम जनतेस कळविण्यात येते की,

खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक सुचिता अंतोन वेगस, वगैरे-८ यांचेकडून सदर नोटीस नमुद मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कोर्लई ता.मुरूड | ३२/१/अ | ०-१०-३९ | २-१४ |

वरील नमुद संपूर्ण मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा करून घेण्याकरिता सदरची नोटीस देण्यांत येत आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्यूपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालू असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी स्वरूपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे पक्षकार खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ॲड.मोहीनेश मनोहर ठाकूर**
**बी.ए.एल.एल.बी. रा.चिंचघर, पो.बोर्ली, ता.मुरूड जि.रायगड**
मोबा.नं.७०५७९०६८१८/८०८००१९११५
ई मेलmohineshthakur1234@gmail.com

# जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा देविदास म्हात्रे व्दितीय

। पेण । प्रतिनिधी ।



पेण विज्ञान निर्भयता निती महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती अलिबाग शाखा यांच्या वतीने २८ फेब्रुवारीमध्ये आयोजित केलेल्या धर्म व अंधश्रध्दा निर्मुलन समिती अलिबाग यांनी आयोजित केलेल्या धर्म व अंधश्रध्दा परस्पर संबंध याविषयावरील आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत वढाव ता.पेण येथील देविदास गणपत म्हात्रे यांना व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

तृतीय क्रमांकाचे पारितोषिक नेताजी पालकर मंडळ चौक खालापूर येथील २६ फेब्रुवारीला नेताजी पालकर यांच्या जन्मस्थळी घेतलेल्या जिल्हास्तरीय घेतलेल्या भारतीय स्वातंत्र्य लढयातील सिध्दगडचे हुतात्मा भाई कोतवाल व हिराजी पाटील कर्जतमधील निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

ज्येष्ठ नागरीक संघ वर्धापन दिन २८ फेब्रुवारी रोजीच्या सभेत पेण तालुका निवृत्त शिक्षक संघटनेच्या सभेत त्यांना गौरवण्यात आले. नोव्हेंबर २०२२ मध्ये त्यांना वनांचे संरक्षण या विषयावर प्रथम क्रमांक उरण येथे तर डिसेंबर २०२२ मध्ये चौक खालापूर येथे तानाजी मालुसऱ्यांचे कार्य या विषयावर व्दितीय क्रमांक मिळाला होता.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला क्रांतीदिनाच्या तयारीचा आढावा

।अलिबाग। वार्ताहर ।

महाड हे ऐतिहासिक शहर असून सोमवार (दि.२०) या ऐतिहासिक दिवशी आंबेडकर अनुयायी सामान्य जनता व लोकप्रतिनिधी मोठया प्रमाणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यासाठी महाड येथे येत असतात. येथे येणाऱ्या अनुयायांना रेल्वे बस सेवा, पिण्याचे पाणी, सुलभ सुविधा, आरोग्य तपासणी, तात्पुरता निवारा, बस थांबा, वाहन पार्किंग व्यवस्था इ.सुविधा पुरविणे व त्यात समन्वय असणे आवश्यक आहे. याकरिता सामाजिक संघटना व संबंधित शासकीय यंत्रणा यांच्यात समन्वय राहण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणा व सामाजिक संघटना यांची एकत्रित बैठक गुरुवार (दि.१६) जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात संपन्न झाली.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त, सुनिल जाधव, महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड, डॉ. प्रताप शिंदे, वाय.एस.प्रमे, तहसिलदार सुरेश काशिद, महाड पोलीस निरीक्षक एम.पी. खोक, पोलीस निरीक्षक रायगड अलिबाग सुवर्णा पत्की, महादेव शेडगे, प्रकाश जमदाडे, प्रकाश मोरे, दिपक पवार, शरद मोरे, आदि मान्यवर उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे अशिलांनी मौजे श्रीबाग नं.२, अलिबाग ता.अलिबाग, येथील खालील वर्णनाची जमीन व घर मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक **अरूण जानबा घोटणे व शोभा अरूण घोटणे** यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा विक्रीचा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे श्रीबाग नं.२, अलिबाग, येथील श्रीबाग क्षेत्र विकास योजना या विभागातील सर्वे नं.२५, २६, १००, १०१ भूखंड क्र.L-51क्षेत्र ७२ चौ.मी. व त्यावरील अलिबाग नगरपरिषद घर मालमत्ता क्र.(Z1ASB2002548) ८अ श्रीबाग नं.२ ही जमीन व घर मिळकत हा या जाहीर नोटिसचा विषय आहे.

तरी वर वर्णन केलेली जमीन व घर मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीं संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१९.०३.२०२३

**मिलिंद चव्हाण**
**ॲडव्होकेट**
८,आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

## जाहीर नोटीस

वादीतर्फे वकील - श्री.सुरेंद्र नारायण जोशी,
निं.न.८/ड

अलिबाग येथील मे.२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात
रेग्युलर मुकदमा नं.३९/२०१९

श्री.चंद्रशेखर काशिनाथ लिमये ...वादी
**विरूद्ध**
श्रीमती सिंधू यशवंत जयवंत, ...प्रतिवादी

**ज्याअर्थी,** वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरूद्ध वादीच्या मालकीच्या अलिबाग नगरपालिका हद्दीतील सिटी सर्वे नं.६६७/१अ/३ या मिळकतीतील घर नं.११६५ मधील प्रतिवादीचे ताब्यातील पूर्व दिशेकडील १ क्रमाकांच्या भाड्याच्या खोलीसंदर्भात ताबा मिळणेसाठी या मे.न्यायालयात दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी ही दावा दाखल करणेपूर्वी मयत असल्याने व तिला जवळचे कोणीही नातेवाईक नसल्याने वादीने सदर दाव्यामध्ये नि.६ कडे अर्ज करून दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, चे क्रम २२ नियम ४अ अन्वये योग्य ती कार्यवाही करून, प्रतिवादीच्या वतीने प्रस्तुतचा दावा चालविणेसाठी कायदेशीर प्रतिनिधी म्हणून महाप्रशासक किंवा न्यायालयाच्या एखादा अधिकारी किंवा मा.न्यायालयात योग्य वाटेल अशा व्यक्तीची नेमणूक करणेबाबत विनंती केली आहे. त्या अर्जावर न्यायालयाने जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेबाबत आदेश केला आहे. सबब श्रीमती श्रीमती सिंधू यशवंत जयवंत, यांचे मृत्यूपश्चात त्यांना कोणीही कायदेशीर प्रतिनिधी व/वा वारस असल्यास, त्या संबंधित व्यक्तीने नेमल्या तारीखेस म्हणजे दिनांक १२/४/२०२३ रोजी या न्यायालयात ठिक सकाळी ११.०० वा.स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून, योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात त्यांचे म्हणणे दाखल करावे. सदर मुदतीत कोणीही वारसाहक्क सांगणेस आले नाहीत, तर श्रीमती इंदिराबाई वासुदेव प्रधान यांना जवळचे कोणीही कायदेशीर प्रतिनिधी व /वा वारस नाहीत असे गृहित धरून पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. अशावेळी मागाहून कोणाचीही, कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची देखील सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस मा.न्यायालयाचे आदेशाने, न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

अलिबाग
तारीख :१७.०३.२०२३

(कोर्टाचा शिक्का)

**क.लिपीक**
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,
रायगड-अलिबाग

**अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
रायगड-अलिबाग

# शेतकरी वर्गाचे नुकसान

। चिरनेर । वार्ताहर ।



चिरनेरपूर्वविभागातगुरुवारीरात्री सायंकाळच्या सुमारास अवकाळी पाऊस बरसायला सुरुवात झाली. आणि जवळजवळ एक तासभर अवकाळी पाऊस पडल्याने येथील शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यात आंबा बागायतदार व वीट कारखानदारांचे फार नुकसान झाले आहे.

या अवकाळी पावसामुळे वीज गायब झाल्यामुळे येथील जनतेला तीन तास अंधारात काढावे लागले. दरम्यान आंबा बागायतदारांची पूरती वाट लागली आहे. आंब्याचे पीक यावर्षी जोरदार आले होते. संपूर्ण आंब्याच्या बागा या मोहरांच्या पिवळ्या रंगाने बहरल्या होत्या. मात्र काही दिवसांपासून सुरू झालेले ढगाळ वातावरण व आता दोन वेळा पडलेला अवकाळी पाऊस यामुळे आंबा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

ढगाळ वातावरण व अवकाळी पावसामुळे मोहरांनी पिवळ्या दिसणाऱ्या आंबा बागा काल्या पडल्या आहेत. दरम्यान मोहरानी सजलेली आंब्यांची झाडे मोहोर आणि कैऱ्या गळून पडल्यामुळे आता ही झाडे रिकामी झाली आहेत. आंबा बागेत मोहराच्या पाकळ्यांचा व कैऱ्यांचा गळून खच पडला आहे. परिणामी आंबा बागेची साफसफाई, सेंद्रिय खते, महागड्या औषधांची फवारणी व बागेची राखण हि सर्व मेहनत आणि झालेला सर्व खर्च वाया गेला असल्याचे येथील आंबा बागायतदार अस्मित ठाकूर यांनी सांगितले.

> यावर्षी पडलेल्या अवकाळी पावसामुळे विटांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे सांगितले. माती, कोळसा, मजूर या आता परवडणाऱ्या गोष्टी राहिल्या नाहीत. पण आता कुठलाच व्यवसाय राहिला नसल्याने आम्ही हा व्यवसाय करत आहोत पण नैसर्गिक संकटामुळे हाही आमचा विटांचा व्यवसाय धोक्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले
>
> \- गोकुळ परदेशी
> वीट कारखानदार

## जाहीर नोटीस

ॲड.विजय वि.पाटील,अलिबाग रायगड

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सो. यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१७/२०२२

**श्री.शेषनाथ शांताराम मोरे,** .... **अर्जदार**
रा.मु.लोणारे, पो.थळ
ता.अलिबाग, जि.रायगड

**विरूद्ध**

**१)श्रीमती. स्नेहा शांताराम मोरे (मयत)**
रा.मु.लोणारे, पो.थळ, ता.अलिबाग, जि.रायगड
**२)सौ.प्रिती किरण मालवणकर**
**पुर्वाश्रमीची कु.प्रिती शांताराम मोरे** ..... सामनेवाला
एव्हरसाइन सिटी, वसई (पू.) ४०१ २०८
**३) सौ.पुजा सुनिल चौधरी**
**पुर्वाश्रमीची कु.पुजा शांताराम मोरे**
रा.रामनाथ ता.अलिबाग, जि.रायगड

या कामातील सामनेवाला यांचे विरुद्ध वादी दिवाणी न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्र.१७/२०२२ नुसार अर्ज दाखल केला आहे. सामनेवाला क्र.३ सामनेवाला समन्स/नोटीसची बजावणी करणेंबाबत दिनांक २४/०१/२०२३ रोजी मे.कोर्टाने आदेश पारीत केलेले आहेत.

तरी या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेंत येते की, सदरच्या अर्जाची पुढील सुनावणी दिनांक २७/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आलेली आहे. तरी सामनेवाला क्र.३ यांस अथवा अन्य कोणासही त्यांचे म्हणणे अथवा हरकत द्यावयाची असल्यास स्वतः अथवा विधिज्ञामार्फत सदरचे तारखेस हजर राहावे. याकामी सामनेवाला क्र.३ यांनी हजर राहून त्यांचे म्हणणे सादर न केल्यास त्यांचेविरुद्ध योग्य तो आदेश पारित करणेंत येतील.

सदरची नोटीस आमच्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यासह दिली आहे.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय व. स्तर अलिबाग

(कोर्टाचा शिक्का)

सही/-
**अधीक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर अलिबाग

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे बोरगाव, ता. पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी असणाऱ्या विद्यमान मालक सौ.माधुरी हेमंत पाटील यांचे हिश्श्याचे स्वतंत्र असे ००-०२-०० (हे.आर.प्रति) एवढे क्षेत्र हे त्यांचे कडून कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं.उपविभाग | एकूण क्षेत्र(हे.आर.प्रति) | आकार(रु.पै.) |
|---|---|---|---|
| बोरगाव | २४९ अ | १-१९-१० | ३०.३१ |

वर वर्णन केलेल्या सदरहू जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी भोगवटादार व मालक म्हणून असणाऱ्या सौ.माधुरी हेमंत पाटील यांचे मालकीचे व हिश्याचे स्वतंत्र्य असे ००-०२.०० (हे.आर.प्रति) एवढे क्षेत्र हे प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे. सदरची मिळकत ही विद्यमान मालक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणचीही विक्री, गहान, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरूपात आणून द्यावेत. सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचे वर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरहू मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पेण
दि.१९/०३/२०२३

**ॲड.संदेश दिनकर गावंड,**
रा.मु.दुरशेत, पो.बळवली
ता.पेण, जि.रायगड
मो.क्र.७०३०३३३६५४/८६०५४१४५६७

# माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



। पाली /गोमाशी/वार्ताहर।

नांदगाव विद्यालयातील १९९६-९७ मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथील नामदेवशेठ खैरे सभागृहात १८ मार्च रोजी आयोजित करण्यात आला होता. ज्या शाळेत शिक्षण घेतले त्या शाळेसाठी काहीतरी देणे लागते या उदात्त भावनेने माजी विद्यार्थ्यांकडून शाळेची रंग रंगोठी करण्यासाठी काही रक्कम प्राचार्य संभाजी ढोपे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. सुनील पवार या माजी विद्यार्थ्यांनी प्रास्ताविक केले. या स्नेह मेळाव्यासाठी प्रा. संभाजी ढोपे, कोडजाई हायस्कूल मुख्याध्यापक सुरेंद्र अहिरराव तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद, १९९६-९७ च्या दहावीच्या बॅचचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी सुधीर सावंत यांनी केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मी महेंद्र हनुमानप्रसाद अग्रवाल रा. तिलोरे, पो. दिवाणमाळ पेण रायगड येथील रहिवासी असून मौजे. तिलोरे , ता. पेण, जि.रायगड येथील मिळकत जमिन मालक भाऊ खंडू एरणकर यांच्या हिस्स्याची क्षेत्र त्यांच्याकडून खाली वर्णन केलेली जमिन मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे

| गाव | गट नं./खाते नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | पो.ख. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| तिलोरे | १२२ /१६५ | | ०-११-०० | ०.०१५० | ०.५६ |

वर वर्णन केलेल्या संपूर्ण जमिन मी स्वतः कायमस्वरुपी खरेदी करणार आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतील कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंधन असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवुन माझी खात्री पटवुन द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत मला बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. १९/०३/२०२३

सही/-
**श्री. महेंद्र हनुमानप्रसाद अग्रवाल**
रा. तिलोरे पो.दिवाणमाळ, पेण रायगड
फोन : ९८२०८७७२८१

## दिन वार्ता

**पंचांग**
१९ मार्च २०२३, रविवार
विक्रम संवत२- २०७९
फाल्गुनशके संवत२- १९४४
संवत्सर - शुभकृत्नाम
अयन- उत्तराणायन
मास- फाल्गुन, ॠतु- शिशिर,कृष्ण पक्ष
तिथि:द्वादशी ०८:०७:२९
तिथि:त्रयोदशी २८:५५:३४+
नक्षत्र:धनिष्ठा २२:०४:०१
योग:सिद्ध २०:०६:४२
करण:तैतिल ०८:०७:२९
करण:गर १८:३१:३७
करण:वणिज २८:५५:३४+
सूर्य:मीन,चन्द्र:कुम्भ११:१७:१२
हिजरी सन२ - १४४४
मुस्लिम मास - शाबान, तारीख - २६
**विशेष**
प्रदोष,मधुकृष्ण त्रयोदशी
श्री योगानंद सरस्वती महाराज पुण्यतिथी - गुंज (परभणी)

**सुविचार**
मनुष्य हा स्वभावत: एक राजकारणी प्राणी आहे.
**- ॲरिस्टॉटल**

## सुडोकू

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 6 | 9 | 5 | | | | | |
| | 8 | | | 7 | 9 | | 2 | 1 |
| | | 7 | 2 | | | | 4 | 6 |
| | 2 | 1 | 9 | | | | | |
| 7 | | 4 | | | | 6 | | 5 |
| | | | | | 6 | 2 | 7 | |
| 3 | 7 | | | | 4 | 8 | | |
| 9 | 4 | | 7 | 8 | | | 5 | |
| | | | | | 5 | 4 | 6 | 7 |

**शनिवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 1 | 8 | 5 | 6 | 4 | 2 | 9 | 3 |
| 6 | 5 | 2 | 9 | 7 | 3 | 1 | 8 | 4 |
| 3 | 9 | 4 | 1 | 2 | 8 | 5 | 6 | 7 |
| 1 | 8 | 7 | 3 | 9 | 6 | 4 | 5 | 2 |
| 4 | 3 | 5 | 2 | 8 | 7 | 6 | 1 | 9 |
| 2 | 6 | 9 | 4 | 5 | 1 | 3 | 7 | 8 |
| 9 | 4 | 6 | 8 | 3 | 5 | 7 | 2 | 1 |
| 8 | 7 | 3 | 6 | 1 | 2 | 9 | 4 | 5 |
| 5 | 2 | 1 | 7 | 4 | 9 | 8 | 3 | 6 |

# कामोठ्यातील अनैतिक धंद्यांना ऊत

## धंदे बंद करण्याचे पोलिसांपुढे आव्हान

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

नवी मुंबई पोलीस आयुक्तपदी मिलिंद भारंबे यांची निवड झाल्यावर आयुक्तालय परिसरातील जवळपास सर्वच पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील अनैतिक धंद्यांना आळा बसल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र, कामोठे पोलीस ठाणे याला अपवाद आहे का, असा सवाल उपस्थित करण्याजोगी परिस्थिती कामोठे वसाहतीत आहे.

याठिकाणी जुगाराचे अड्डे, हुक्का पार्लर, नियम धाब्यावर बसवून सुरु असलेले ढाबे, अमली पदार्थांची आणि गुटख्याची सुरु असलेली विक्री, मसाज पार्लरच्या नावावर सुरु असलेले वेश्या व्यवसाय आणि बियर शॉपीच्या नावावर खुलेआम केले जाणारे मद्यपान रोखण्यात कामोठे पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना अद्याप अपयश आले असल्याचे पाहायला मिळत आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यालयातील विशेष शाखेत कार्यरत असलेल्या अजय कांबळे यांची नुकतीच कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे यांच्या सूचनेनुसार झालेल्या या नियुक्ती मुळे आयुक्त भांबरे यांच्याप्रमाणेच कठोर कारवाई करून कामोठे परिसरात राजरोसपणे सुरु असलेल्या अनैतिक धंद्यांविरोधात आघाडी उघडून हे धंदे बंद करण्याचे काम श्री. कांबळे करतील, अशी अपेक्षा सामान्य कामोठेकर करीत आहेत. तरी, या अवैधधंद्यांविरोधात तात्काळ कारवाई करुन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी येथील नागरिक करीत आहेत.

> कामोठे वसाहतीमध्ये बेकायदेशीरपणे सुरु असलेले धंदे बंद व्हावेत याकरिता वसाहतीमधील सामाजिक संस्था आणि राजकीय पक्षांनी कायम प्रयत्न केले आहेत. कामोठे पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून नव्याने रुजू झालेले अधिकारी या धंद्यावर नियंत्रण मिळवतील, अशी अपेक्षा कामोठेकर करीत आहेत.
> - अमोल शितोळे, कामोठे शहराध्यक्ष, शेतकरी कामगार पक्ष

**नामांकित हॉटेलचे अवैध धंदे**
कामोठे वसाहतीमधील सेक्टर सहा परिसरात सायन-पनवेल महामार्गालगत असलेल्या एका नामांकित हॉटेलमधील तिसऱ्या मजल्यावर मसाज पार्लरच्या नावावर वेश्या व्यवसाय सुरु आहे. तर याच हॉटेलच्या सर्वात वरच्या भागात रात्री उशिरापर्यंत तंबाखूजन्य हुक्क्याचा धूर उडवण्याचे काम केले जात आहे.

**गर्दूल्यांचे अड्डे**
वसाहतीमधील उद्यान आणि मोकळ्या मैदानात मोठ्या प्रमाणात गर्दूल्यांचा वावर असल्याने या भागात जाणे महिला वर्ग टाळत आहेत. परिसरात होणाऱ्या गर्दूल्यांच्या त्रासाविरोधात आवाज उचलणाऱ्यांना धमकवण्याचे प्रकारदेखील हे गर्दूले करत असल्याने परिसरात खुलेआम अमली पदार्थ उपलब्ध असल्याचे स्पष्ट होत आहे.

**स्थानिक पोलिसांचा आशीर्वाद**
वसाहतीत सुरु असलेल्या या अवैध व्यवसायांना काही पोलीस कर्मचाऱ्यांचा आशीर्वाद असल्याचा आरोप राजाराम पाटील या नागरिकाने केला आहे. नवनियुक्त पोलीस अधिकारी या कर्मचाऱ्यांची मक्तेदारी मोडीत काढतील, असा आशावाददेखील पाटील यांनी व्यक्त केला आहे.

**जुगाराच्या अड्ड्यांमध्ये भर**
नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील जुगाराचे अड्डे एकीकडे बंद झाले आहेत. मात्र, त्याच वेळी कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी कांबळे यांची नियुक्ती होताच पोलीस ठाण्याच्या हद्दीत नवपाडा गाव परिसरातील एका पार्किंगमध्ये वातानुकुलीत जुगार अड्ड्याची भर पडल्याचे पाहायला मिळत आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी बोलणे टाळले**
या सर्व प्रकाराबाबत प्रतिक्रिया विचारण्यासाठी कामोठे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांबळे यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता आपण या विषयावर समक्ष बोलू असे सांगून त्यांनी विषय टाळण्याचा प्रयत्न केला आहे.

## सिडकोच्या मेडी सिटीला स्थानिकांचा विरोध




**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील पिढ्यांन् पिढ्या वसलेली गावे उठवून तेथे सिडको मेडी सिटी नावाचा प्रकल्प राबविणार आहे. या प्रकल्पाला स्थानिकांनी विरोध केला असून, आमची एक इंचही जागा देणार नाही, असे सिडकोला ठणकावून सांगितले.

दरम्यान, येथील गावे, घरे वाचविण्यासाठी सिडकोबाधित घरे व जमीन बचाव कृती समिती, उरणतर्फे सिडको कार्यालय, सीबीडी बेलापूर येथे मोठा मोर्चा काढण्यात आला होता. कॉ. भूषण पाटील, अरविंद घरत व अनेक बंधू-भगिनींनी नेतृत्व केले. सिडकोचे जॉईंट एम.डी. यांची शिष्टमंडळाने भेट घेतली आणि हा प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही, त्यासाठी एक इंचही जमीन देणार नाही, असे त्यांना ठणकावून सांगितले.

ॲड. सुरेश ठाकूर यांनी नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या सर्व संघटनांना बरोबर घेऊन उरण-पनवेल ते मंत्रालय असा महामोर्चा काढण्यात येईल, असे यावेळी जाहीर केले.

## शब्दकोडे क्र.७०



**आडवे शब्द:** १. प्रवासात उपयोगी३. पाण्याचा साठा, तळे७. बळजबरीचा मुक्काम११. पाहून पाहून वाईटाचीही सवय होणे१२. धातूचा नाजूक तंतू१३. लाकडाची उत्कृष्ट जात१४. समुदाय, गट१६. एक नैसर्गिक शीतपेय१७. थडगे१८. मृत्यू नसलेला१९. मान, प्रतिष्ठा, बूज२०. सुकुमार २१. चंदन उगाळण्याचा दगड२४. मधली खोली२६. गावातील देवाचा उरुस२७. 'एनओसी' मराठीत३१. पुढारी३२. लढाई, चकमक३३. जागृत, चकमक३३. जागृत, स्थान३५. हुशार, चलाख३७. श्रेष्ठ पुरुष३९. सुतळीचे कापड४२. तिंबा!४४. पुत्र, मुलगा४६. फसविणे४८. कान व डोळे ताठ करणे५०. सैन्याचा मालपुरवठा५२. वजा५३. सरस्वतीचे एक नाव५६. माराची खूण५७. क्षण (हिंदी)५८. ओलसर हवा६०. पुन्हा पुन्हा६३. ऱ्हस्व असल्यासव्याधी६४.पुंकेसर ६५. मत्स्य६७. बोलणे६९. मुलगा७०. टाळ्यांचा जोरदार आवाज७१. अगम्य७३. खटला७५. स्तुती करणारा७६. अस्वल७७. जन्म, मृत्यू७८. तटबंदी

**उभे शब्द:**१. चाहता२. यामुळे रामायण घडले३. जन्मदात्री४. नेहमी बुजणारा५. बाण६. मृत्यूनंतरचे मुक्कामाचे स्थान७. ठाण्याचा रहिवासी८. वाघाची मावशी९. भीती, भय१०. अजित नावाच्या भारतीय गोलंदाजाचे आडनाव१३. सामोपचार१५. भाताला दिलेला आकार१८. धाकटा भाऊ२०. हुल्लकी, लहर२१. च्या बरोबर२२. जय-पराजय२३. कर्ज, उपकार२४. फे , केवळ२५. जाते फिरतानाचा आवाज२६. जन्मापासून२७. ख्रिसमस२८. शिव्याशाप २९. हत्तीचा शिक्षक३०. वारा३२. वर्ष३४. थंडीने गार पडणे३६. दारूचा एक प्रकार३८. आवाज, गोंगाट४०. रोखलेली नजर४१. एक जंगली फूल४३. वरपांगी४५. सोसाट्याचा वारा ४७. अवाढव्य, भव्य४९. उणे५१. नवऱ्याची दुसरी पत्नी५२. संयम सुटलेला, अधीर५४. बरणीला लावण्याचे फडके५५. विहीर, --नलिका५७. मान्यतापत्र५९. नंतर६०. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना६१. थेट, सरळ६२. धोबी६५. हा जनात सांगावा, विरूद्ध असल्यास मनातच ठेवावा असे म्हणतात६६. बडबड६८. नोकरी७१. शर्त, पण७२. फोडातील द्रव७४. डावा

### शब्दकोडे क्र.६९ चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.श्रीराम जयराम जयजयराम २.अट १२.हित १३.जनन १४.मम १५.रमावर १६.तबला १७.खस १८.तारा २०.रावण २२.हौस २४.जर २५.कडक २७.गदा २९.खळखळाट ३०.दादला ३१.तुलसीदास ३३.मदन ३४.काजळ ३६.पुरा ३८.हमाल ३९.गारवा ४०.सर्वत्र ४१.हालचाल ४२.महाशय ४४.नफा ४६.पातक ४७.वार ४९.वाकडा ५२.कवच ५४.खरवस ५६.काजळी ५८.कडप्पा ५९.लामणदिवा ६०.रानटी ६२.सखी ६३.लगत ६५.बत्ती ६६.तलवार ६९.मदार ७०.बेकायदा ७२.डाकीण ७३.गरज ७४.सरदार ७५.सदरा ७७.रबर ७८.वंदन ८१.जागरण ८२.रातवा ८३.कारखाना

**उभे उत्तर**
१.श्रीमंत २.महिला ३.जत ४.राजस ५.मन ६.जनता ७.जम ८.यमराज ९.मरण १०.अवघड ११.टर १७.खसखस १९.रागीट २१.वरदान २३.पाखर २५.कलाकार २६.कमळ २७.गल २८.दासीपुत्र ३१.तुळस ३२.दारा ३३.मलम ३५.जवान ३७.लोलक ३८.हलवा ३९.गायक ४१.हातचलाखी ४३.शवासन ४५.फासळी ४६.पाव ४८.रखवालदार ५०.डाका ५१.चाकवत ५२.कप्पा ५३.आणखी ५५.वरात ५७.जबाबदार ६१.टीकाकार ६२.सरडा ६४.गरजवंत ६७.लवाद ६८.रणरण ६९.मगर ७०.बेसन ७१.यदा ७५.सख्य ७६.राजा ७९.दवा ८०.ताना

# साप्ताहिक राशिभविष्य : दि. १९ ते २५ मार्च २०२३

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## कामात लक्ष द्या



**मेष :** राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पूर्वार्धात आपणास पत्नी, संतती, वडीलधारी व मित्र परिवाराकडून सुखद बातम्या मिळण्याची किंवा त्यांच्यामुळे काही फायदा होण्याची शक्यता आहे. कुटुंबियांकडून एखाद्या महागड्या वस्तूंची भेट मिळण्याची अपेक्षा बाळगू शकता. या सप्ताहात कोणत्याही बौद्धिक प्रतिभेशी संबंधित कार्ये, चर्चा इत्यादी दरम्यान थोडी काळजी न घेतल्यास आपणास खोटे ठरविण्यात येण्याची किंवा आपल्या हातून चुकीचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. आपली विश्लेषण शक्ती मंदावल्यामुळे जेथे बुद्धीची नाही, तर श्रमांची गरज असेल अशा गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे. सरकारी व कोर्टकचेरी आदी कारणांसाठी खर्च होऊ शकतो.

**महिलांना :** आपली प्रतिमा मलीन होईल अशा कार्यापासून दूर राहावे. सध्या कोणास जामीन राहू नये. बँकेतसुद्धा कोणास जामीन राहू नका. संबंधातील अत्युच्य आनंद उपभोगू शकाल. त्यातसुद्धा उत्तरार्धात भिन्नलिंगी व्यक्तीशी खूप जवळीक साधू शकाल. या सप्ताहात उत्तरार्धात हृदयाच्या ठोक्यांची अनियमितता, पाठदुखी यांचा त्रास संभवतो. **शुभदिनांक :** २१,२३.

## कामाची प्रशंसा होईल



**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण व्यावसायिक आघाडीसाठी पूर्वार्ध अधिक अनुकूल आहे. व्यावसायिक आघाडीवर प्रतिस्पर्धी व शत्रूंवर आपण मात करू शकाल. आपल्या कौशल्याच्या जोरावर आपण लोकांच्या प्रशंसेस पात्र व्हाल. नोकरी करणाऱ्यांच्या कामात व विचारात सर्जनात्मकता दिसून आल्याने पदोन्नतीची शक्यता नाकारता येत नाही. उत्तरार्धात शासकीय व कायदाबाबत अडथळे येऊ शकतात. उत्तरार्धात आपली प्रतिमा मलीन होईल अशा कार्यापासून दूर राहावे. पूर्वार्धात पिता किंवा वडीलधाऱ्या व्यक्तींकडून लाभ होईल. परंतु, उत्तरार्धात पैतृक संपत्तीशी संबंधित कार्यात विघ्ने येण्याची किंवा अपेक्षेनुसार फलप्राप्ती न होण्याची शक्यता आहे. मित्र, पत्नी, संतती यांच्याकडून लाभ होईल. स्त्री मित्रांकडून लाभ होईल.

**महिलांना :** दाम्पत्य जीवनातसुद्धा विचारातील प्रगल्भतेमुळे एकमेकांच्या सहवासाचा अत्युच्च आनंद उपभोगू शकाल. पती-पत्नीत एकमेकांप्रतीचे आकर्षण टिकून राहील. आरोग्याच्या दृष्टीने पूर्वार्ध चांगला आहे, त्याचा आनंद घ्या. **शुभदिनांक :** १९,२२

## रागावर नियंत्रण ठेवा



**धनु :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आरोग्याच्या बाबतीत जे मागील काही दिवसांपासून आजारी होते त्यांना काहीसा दिलासा मिळेल. ज्यांना ॲलर्जी, त्वचा विकार किंवा एखादी जुनी समस्या असेल तर त्यांना उत्तरार्धात दिलासा मिळू शकेल. प्रणयी जीवनात पुढील वाटचाल गुलाबी होण्याची किंवा नवीन संबंधांची सुरुवात होण्याची शक्यता आहे. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तींचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **महिलांना :** आपली माहेरची माणसे घरी येतील, त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्येतीकडे दुर्लक्ष करू नका. घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **शुभदिनांक :** २०, २४.


## व्यवसायात यश



**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता पूर्वार्धात विद्यार्थ्यांचा अभ्यास उत्तम झाला तरी उत्तरार्धात कोणत्याही विषयाचे खोलवर अध्ययन करण्यासाठी अधिक कष्ट करण्याची तयारी ठेवावी लागेल. या पूर्वार्धात व्यावसायिक आघाडीवर आपल्या कामांना गती येईल. आपल्या शब्दांचे मोल वाढेल. जी स्वप्ने मागील कालावधीत बघितली असतील, ती आता प्रत्यक्षात येतील. आपल्या अंतर्ज्ञानात व कल्पनाशक्तीत भर पडेल. आपण आशावादी व सकारात्मक वृत्तीचे आचरण कराल. काही वेळा आपली गती मंदावली गेली तरी आपल्या वाटचालीत व निर्णयात ठामपणा नक्कीच राहील. आपणास नवीन व चांगल्या कार्याकडे लक्ष द्यावेच लागेल. आपण गृहस्थजीवनास सुद्धा योग्य महत्त्व देऊन त्यानुसार वाटचाल करण्याची तयारी ठेवाल.

**महिलांना :** कुटुंबाप्रती आपला कल वाढत असल्याचे दिसून येईल. सप्ताहाच्या शेवटी आपली मनोरंजनाची इच्छा प्रबळ होईल. सामाजिक किंवा धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. समाजाप्रती आपले ऋण चुकविण्यासाठी आपण सक्रिय व्हाल. फिरण्याचा बेत पूर्ण करू शकाल. **शुभदिनांक :** २२, २५.


## धनप्राप्तीचे योग



**कन्या :** राशीसाठी या सप्ताहात सुरुवातीला तुमचे शत्रू तुमचे काम बिघडवण्याचा प्रयत्न करतील. व्यापार-संबंधित लोकांना नुकसान होऊ शकते. असे झाले तरी तुम्हाला वरिष्ठ लोकांचे आणि कुटुंबातील मोठ्यांचे भरपूर साहाय्य मिळेल. नकोसे खर्चही वाढू शकतात. नव्या जबाबदाऱ्या मिळू शकतात. पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. मिळकतीचे स्रोत वाढतील. धनप्राप्तीचे योग आहेत. सामाजिक कार्यात तुम्ही सतत तत्पर राहाल. प्रेम-प्रसंग विवाहापर्यंत पोहोचण्याचे योग आहेत. आई-वडिलांच्या बोलण्याकडे पूर्ण लक्ष द्या, नाहीतर ते नाराज होऊ शकतात. पण, व्यवस्थित समजवल्याने त्यांची नाराजी दूर होऊ शकते. स्वास्थ्य उत्तम राहील. कोणतेही नवे काम करण्याआधी त्याच्या प्रत्येक पैलूचा बारकाईने विचार करा. जोडीदाराच्या प्रेमाचा फायदा घ्या. कुठलीही गोष्ट मिळवण्यासाठी तुम्ही केलेली घाईगडबड, नुकसान करू शकते.

**महिलांना :** वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. आपण एखाद्या अशा व्यक्तीप्रती आकर्षित व्हाल की जी आपल्याहून वयाने अधिक मोठी किंवा लहान असेल. **शुभदिनांक :** २०,२५.


## कलागुणांना प्रोत्साहन मिळेल



**मकर :** हा सप्ताह मकरराशीसाठी ग्रहमान पाहता विद्यार्थ्यांना कोणत्याही विषयाचा खोलवर अभ्यास करताना आपली आकलनशक्ती कमी असल्याचे जाणवेल. तरीही त्यांना अभ्यासाची गोडी लागल्याने उत्तरार्धात त्याचे चांगले परिणाम मिळू शकतील. त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण आपली अस्मिता क्षुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. कामाशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपण कष्ट कराल. नवीन मैत्री करताना सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. नोकरदारांना दिलासा मिळेल. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा.

**महिलांना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. पर्स भरलेली राहील
**शुभदिनांक :** २२, २३.


## नव्या वास्तू खरेदीचे योग



**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण ह्या साप्ताहात कौटुंबिक आघाडीवर एखाद्या व्यक्तीशी आपल्या वागणुकीत उग्रता दिसून येईल. वाणी व वर्तनात काठिण्य राहील, तेव्हा काळजी घ्यावी. कोणत्याही बाबतीत हट्ट सोडण्याचा सल्ला देण्यात येत आहे. हे सर्व आपण कुटुंबाप्रती अतिसंवेदनशील झाल्यामुळेच होणार असले तरी आपल्या भावना समजून घेण्यास कुटुंबियांना थोडा वेळ लागेल. त्यांच्या खुशीसाठी आपण वाहन, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा अन्य एखादी मोठी वस्तू खरेदी करण्याची शक्यता आहे. त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सध्या व्यावसायिक आघाडीवरसुद्धा अतिरिक्त परिश्रम कराल. घरातील संबंधात थोडी काळजी घ्यावी लागेल. विशेषतः जे आधीपासूनच दुर्लक्ष करत आहेत त्यांना प्रिय व्यक्तीशी संबंधित एखाद्या बाबतीत सतत काळजी वाटेल. सध्या व्यापारसंबंधात आपणास थोडी अनिश्चितता जाणवेल.

**महिलांना :** विवाहेच्छुकांना जोडीदाराची निवड विचारपूर्वक करावी लागेल. उत्तरार्धात प्रियजनांसह बाहेर फिरावयास जाण्याचे तसेच भोजनाचे आयोजन करू शकाल. **शुभदिनांक :** १९,२०.

## नोकरीत पदोन्नतीची शक्यता



**तूळ :** राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. व्यवसायात आपली बौद्धिक क्षमता प्रदर्शित झाल्याने नोकरीत पदोन्नती होऊ शकेल. व्यापाऱ्यांना दूरवरचे सौदे प्राप्त होण्याची शक्यता आहे. जे मुद्रण, रसायन, औषधे, शासकीय कार्य किंवा कंत्राट इत्यादींशी संबंधित आहेत, त्यांना उत्तरार्ध अधिक फलदायी होऊ शकेल. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वार्धात चांगली संधी मिळू शकेल. मात्र, व्यापक विचार केल्यास आपणास अभ्यासातील एकाग्रता वाढवावी लागेल. विद्यार्थ्यांना अभ्यासातील समस्यांचे निराकरण झाल्याने दिलासा मिळेल. तरी उत्तरार्धात विशेषतः रक्तदाब, हृदयाच्या ठोक्यांची अनियमितता किंवा डोळ्यांची जळजळ इत्यादी समस्या होण्याची शक्यता आहे. **महिलांना :** नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. नोकरीत त्रास होईल. आर्थिक स्तरावर त्रासात राहू शकता, जोडीदाराचे वागणेही तुम्हाला त्रासात टाकू शकते. आपले प्राधान्य हे आपल्या कामांनाच असेल. **शुभदिनांक :** २१,२२.


## जोडीदाराची साथ मिळेल



**कुंभ :** राशी या सप्ताहातील आपले ग्रहमान पाहता भौतिक सुखांमध्ये वृद्धी होईल. मिळकतीचे नवे मार्ग उघडतील. जुन्या समस्या निरोप घेण्याच्या मार्गावर आहेत. नव्या संपर्कांचा फायदा होईल. भौतिक सुखांमध्ये वृद्धी होईल. मिळकतीचे नवेमार्ग उघडतील. नोकरी किंवा व्यवसाय संबंधाने शहराच्या बाहेर जाण्याचे योग आहेत. हा सप्ताह साधारण असला तरी स्वास्थ्य ठीक-ठाक राहील. जोडीदाराची साथ मिळेल. तुमच्या बोलण्याचा मान राखला जाईल. धार्मिक कार्यात आवड वाढेल. तब्येत ठीक करण्यासाठी सकाळी फिरायला जावे. मनासारखे स्थळं न मिळाल्याने निराशा राहील. वडील आणि भावाशी वाद होतील. वाहन चालवताना अति-दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. मद्यपान करताना संयम ठेवा. जुनी थांबलेली कामे मार्गी लागतील. कोणालाही खोटे आश्वासन देऊ नका, पाऊस चांगला झाल्याने शेतकऱ्यांनाही फायदा होईल. विरोधक शांत राहतील.

**महिलांना :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभदिनांक :** २४, २५.


## परिश्रमाचे फळ मिळेल



**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता पूर्वार्धात चिंतन करून आपण आपल्या काही दोषांचेसुद्धा निराकरण करू शकाल. थोड्या प्रतिकूलतेस सामोरे गेल्यानंतर आपणास हळूहळू दिलासा मिळू लागेल. उत्तरार्धात गृहसजावटीचे कार्य हाती घ्याल. अतिरिक्त कामामुळे शरीरास थोडा थकवा जाणवला तरी त्यामुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता असल्याने आपण काही तक्रार करणार नाही. व्यावसायिक आघाडीवर आपल्या कष्टाचे फळ मिळू लागेल. सुरुवातीस आपली कामे नियोजनानुसार पूर्णत्वास नेण्यात परिश्रम करावे लागले किंवा आपले फासे उलटे पडले तरी निराश न होता प्रयत्न चालू ठेवल्यास उत्तरार्धात यश प्राप्ती होऊन आपणास मानसिक दिलासा मिळेल. पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठांशी काही कारणाने वाद होणार नाहीत, याची काळजी घ्यावी. कायद्या विरुद्ध कार्ये किंवा अनैतिक कार्ये करून आर्थिक प्राप्ती करण्याचे विचार मनातून काढून टाका.

**महिलांना :** आपल्या प्रिय व्यक्तीसाठी एखादी सुंदर वस्तू खरेदी करण्यासाठी आपण खर्च कराल. प्रिय व्यक्ती, मित्र, नातेवाईक ह्यांच्या सहवासात बहुतांश वेळ घालवाल. **शुभदिनांक :** २१,२३.

## आरोग्याची काळजी घ्या



**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आपण या कालावधीत आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या तीन दिवसांत पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. शक्य तितका स्वभावातील उग्रपणा नियंत्रित ठेवलात तर संबंधात दुरावा निर्माण होणार नाही. प्रियव्यक्तीच्या सहवासाचा आनंद उपभोगू शकाल. एखाद्या रमणीय स्थळी फिरावयास किंवा छोटाशा प्रवासास जाऊन आनंदात वेळ घालवू शकाल. पूर्वार्धात विद्यार्थ्यांना परिश्रम वाढवावे लागले तरी उत्तरार्धात त्याचे चांगले फळ मिळू शकेल. बौद्धिक प्रवृत्ती व चर्चेस आपण प्राधान्य द्याल. पूर्वार्धात आपणास आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. वाहन चालवताना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेणे आवश्यक आहे. **महिलांना :** हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. महिलावर्गाला सासूरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून, त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. **शुभदिनांक :** १९,२०.

## भाग्यवृद्धीचा काळ



**मीन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता प्रतिस्पर्धी व शत्रूंवर आपण मात करू शकाल. एकंदरीत भाग्यवृद्धीचा काळ आहे. आपल्या मनात विविध विचारांचे तरंग उमटतील. कुटुंबात सुख-शांती नांदेल. विवाहेच्छुकांच्या विवाहाचा मार्ग मोकळा होईल. भिन्नलिंगी व्यक्तींप्रती आकर्षित व्हाल. मात्र, संबंधात आपला अहंकार बाजूस सारावा लागेल. नवीन प्रकल्पांची सुरवात करू शकाल. प्रियव्यक्तीच्या सहवासाने आनंदित व्हाल. वडीलधाऱ्यांशी आपले संबंध सुधारतील. आपले आरोग्य उत्तम राहील. आजवर केलेल्या कामामुळे यश व कीर्ती ह्यात वाढ होऊन आणखी काही करण्याचा उत्साह निर्माण होईल तसेच आपल्या आत्मविश्वासात वाढ होईल. नवीन वस्त्रालंकार व वाहन खरेदी करू शकाल. उत्तरार्धात आपल्या आरोग्यात उल्लेखनीय सुधारणा होऊन चेहऱ्यावर त्याचे तेज दिसून येईल. **महिलांना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभदिनांक :** २०,२४.

# मोहोर



चिंतन

प्रसाद केरकर
९८६७७२१११०

## वातावरण बदल



यंदा फेब्रुवारी महिन्यात आजवरच्या तापमानाचा उच्चांक नोंदविला गेला. हा एक स्थापन झालेला विक्रमच म्हणावा लागेल. त्याअगोदर सात मार्च रोजी मुंबईसह राज्यातील अनेक भागात विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटासह अवकाळी पाऊस पडला. महाराष्ट्रात या पावसाने केळी, द्राक्ष व इतर पिकांचे मोठे नुकसान झाले. हे सर्व काही अनपेक्षितच असे होते. अर्थात गेल्या काही वर्षात अशा प्रकारे अवकाळी पाऊस पडणे, उन्हाळा कडक पडणे किंवा थंडीचे प्रमाण वाढणे ही बाब वारंवार घडत आहे. याचा जगाला असलेला धोका अजून कोणी गांभीर्याने घेतलेला नाही, ही सर्वात जास्त गंभीर बाब आहे.

तापमान, पाऊस, आर्द्रता इ. च्या वैज्ञानिक नोंदी जगात अलिकडे म्हणजे शे-दिडशे वर्षांपासुन ठेवल्या जाऊ लागल्या. आता जो आकडा दिला जातो त्यापेक्षा प्रत्यक्ष अनुभवलेले तापमान ३ ते ५ डि. से ने जास्तच असते. या फेब्रुवारीत म्हणूनच ४० ते ४५ चा जाळ अनुभवला. आता जे घडत आहे ते शे-दिडशे वर्षांतील ऐतिहासिक नसून पृथ्वीच्या कोट्यावधी वर्षांच्या इतिहासातील हा अभूतपूर्व कालखंड आहे. मानवाने निसर्गाची जी हानी गेल्या काही वर्षात केली आहे त्याचेच हे पडसाद उमटत आहेत. मुंबई व देशातील मोठ्या महानगरातील वायुप्रदूषणाबाबत सतत बोलले जाते. माध्यमांतून वैज्ञानिक संस्थांची आकडेवारी फेकली जाते. मात्र शहरात रोज काही हजार टन कार्बन उत्सर्जन करणारे, मोटार हे सर्वात मुख्य कारण आहे ही गोष्ट लपवली जाते. शहरातील सुमारे ५० लाख मोटारींची वायुप्रदूषणात आणि त्यामुळेच विक्रमी तापमानात गुन्हेगारी स्वरूपाची भूमिका आहे. परंतु मोटारीचे प्राणघातक आकर्षण आणि तिला अर्थव्यवस्थेचे प्रतीक बनवल्यामुळे हा निखारा मुठीत लपवला जात आहे. आजपर्यंत आपण सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करुन लोकांना सुविधा देण्याचा व पर्यायाने प्रदूषण कमी करण्याचा विचार कधी केलाच नाही. उलट वाहन उद्योग वाढतोय त्यातून रोजगार निर्मिती होतेय यावर जास्त भर दिला गेला. हे सर्व गणितच चुकीचे होते, हे आता दिसतेय. त्याचबरोबर गेल्या काही वर्षात आपण सिमेंटचे रस्ते भरण्याचा सपाटा लावलाय. एकच रस्ता पुन्हा पुन्हा फोडला व बनवला जात आहे. यापूर्वी पदपथ अशा रितीने उखडुन पुन्हा बनवले जात होते आणि आता रस्ते. सिमेंटच्या रस्त्याच्या उभारणीमुळे आपल्याकडे उष्णता वाढीस लागली आहे. परंतु हे रस्ते बांधले की किमान वीस वर्षे चिंता नाही असे लक्षात आल्यावर आपण हा धोका स्वीकारु लागलो आहोत. परंतु जे रस्ते पूर्वी डांबरीकरणातून ब्रिटीशांच्या काळात बांधले गेले होते ते आजही उत्कृष्ट स्थितीत आहेत. मग सध्याचेच डांबरी रस्ते का खराब होतात असा सवाल आहे. सिमेंटच्या रस्त्यांची हजारो कोटी खर्चाची टूम कुणाचे खोके भरण्यासाठी आहे? यातुन मुंबईची चाळण केली जात आहे. नागरिक धूळ आणि इतर समस्यांमुळे हैराण झाले आहेत. परिणामी छातीत प्रदूषण भरून घेऊन जीव मुठीत धरून नागरिक यंत्रवत जगत आहेत. प्रदूषणाची निर्मिती जेथून होते ते उत्पादन थांबवले पाहिजे. केवळ उर्जास्त्रोताबद्दल बोलून काही होणार नाही. उदा. पेट्रोल-डिझेल जाळण्याऐवजी मोटार वीजेवर नेली. आता त्यामुळे औष्णिक वीजनिर्मितीत अधिक कोळसा जाळला जाऊ लागला. पृथ्वीच्या वातावरणात जाणाऱ्या कार्बन डाय ऑक्साईड वायूपैकी सुमारे ७५ टक्के उत्सर्जनास वाहने कारणीभूत आहेत. मोटारींद्वारे वार्षिक ४००० कोटी टन उत्सर्जनापैकी ४० टक्के म्हणजे सुमारे १६०० कोटी टन कार्बन डाय ऑक्साईड वायूचे उत्सर्जन होते. एका मोटारीच्या निर्मितीस सुमारे १,५०,००० लिटर पाणी लागते. त्यावर उपाय म्हणजे मोटारीचा वापर कमी किंवा बंद करणे हा आहे. परंतु हे कुणाला आवडणार नाही, परंतु नागरिकांना हा कडू घोट घ्यावाच लागेल. हीच गोष्ट बांधकामाबाबत आहे. सायन-माहिम ते कुलाबा ही मूळ बेटांची मुंबई, भूकंपप्रवणतेच्या दृष्टीने अतिधोकादायक चौथ्या प्रवर्गात येते. भविष्यात इकडे कोणताही धोका होऊ शकतो. सिमेंट काँक्रीट बांधकामात मानवजातीची कबर खोदली जात आहे. एक टन काँक्रीट बनताना सुमारे एक टन कार्बन डाय ऑक्साईड वायू वातावरणात सोडला जातो आणि या प्रक्रियेत सुमारे २००० टन पाणी वापरले जाते. पृथ्वीच्या प्रदीर्घ तपस्येने घडलेली जीवसृष्टी व जडण- घडण मानवाच्या निर्जिव विकासात क्षणोक्षणी नष्ट होत आहे. सिमेंट, काँक्रीटसाठी चुनखडी, वाळू, दगड इ. साहित्यासाठी डोंगर, जंगल तोडले जाते. राडा, रोडा सागर खाड्यांमधे भरला जातो. यात जैव विविधतेचा व नदी झऱ्यांचा नाश होतो. सिमेंट निर्माणात दरवर्षी पृथ्वीच्या वातावरणात सुमारे ४०० कोटी टन कार्बन डाय ऑक्साईड वायूची भर पडते. मोटारीचा व सिमेंटीकरण काँक्रीटीकरण व टॉवर्स बांधणीशी संबंध आहे. विकासाच्या नावाने शहरांची सततची बांधकामे व ग्रामीण भागांचे शहरीकरण यामुळे पृथ्वीवरील लाखो चौरस किलोमीटर क्षेत्र काँक्रीटखाली येत आहे. भूपृष्ठाची रचना, भूजल वहन मोडले जात आहे. जीवसृष्टी व त्यातही मातीशी जोडलेले जीव, सुप्तावस्थेत जाणारे प्राणी गाडले जात आहेत. हे पृथ्वीची कबर बांधणे आहे. आपल्याला अस्तित्व देणाऱ्या पृथ्वीशी द्रोह आहे. याची किंमत मानवजातीचे उच्चाटन व मानवजातीची सामूहिक आत्महत्या आहे. प्रदूषणाचा विचार करताना हवा, पाणी व मातीच्या प्रदूषणाचा आणि मुंबई, लंडन, न्ययॉर्क असा वेगवेगळा विचार केला जातो, हे चूक आहे. पृथ्वी तुकड्यांत काम करत नाही. ती समग्रतेने काम करणारी एकसंघ सेंद्रीय कार्यपद्धती आहे. प्राणवायू, पाणी व अन्न हे पृथ्वीने सृजन केलेल्या सजीवांसाठी आहे. परंतु मानवाने निर्माण केलेल्या मोटार, विमान जहाजे, टीव्ही, फ्रीज, कॉम्प्युटर इ. निर्जिव यंत्रांसाठी व वीज, सिमेंट, पोलाद, प्लास्टिक, फायबर अशा हजारो कृत्रिम उत्पादनांसाठी नाही, जी पृथ्वीवर अपरिवर्तनीय बदल व अक्षम्य हानी करतात. सुशिक्षित माणसे भ्रमात आहेत. भौतिक विकास हा शुद्ध मूर्खपणा आहे. याच विकासातून माणूस आपला घात करुन घेत आहे. सध्या होत असलेले वातावरणातील मोठे बदल हेच दर्शवितात. ■■



वन्यस्य कथा रम्या

डॉ. प्रसाद दाभोळकर
९८७०५२५६२६, ७९७७४५४३७७

> समुद्री कासव गोड्या पाण्यात जात अथवा राहत नाहीत, तसचं हिराकोट तलाव समुद्राशी कुठल्याच मार्गाने जोडलेला नाही. तर हे कासव ह्यात आलं कसं हे कोडं काही मला उलगडेना. त्वरित हालचाल करणं आवश्यक होतं, मी लगेच ओमकार कामतेकर, पारस घरत आणि अदिती सगर ह्यांना फोन केले आणि तलावावर पोहोचण्यास सांगितले. ओमकार, पारस आणि अदिती आमच्या ग्रुपची खरी क्विक रिस्पॉन्स टीम आहे! कुठेही कुठलाही साप किंवा इतर वन्यप्राणी आढळला अथवा आजारी वा जखमी असल्याची खबर मिळाली, की रात्रं-दिवस, उन-वारा पाऊस ह्या कशाचीही पर्वा न करता ही त्रयी सर्वात आधी स्पॉट वर पोचते आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने सुटका करते.



## हिराकोटमधील कासव

आपल्या कोकणाला फार समृध्द समुद्र किनारपट्टी लाभली आहे. रायगड जिल्हा काही त्याला अपवाद नाही. साहजिकच आपल्याकडे विविध सागरी प्राणी विपुल प्रमाणात आढळून येतात. अनेक प्रकारचे मासे, खेकडे, शिंपल्यात राहणारे जीव, डॉल्फिन- व्हेल सारखे समुद्रातील सस्तन प्राणी, समुद्री पक्षी, समुद्री साप आणि समुद्री कासव ह्यांचा ह्यात प्रामुख्याने समावेश होतो.

समद्रात राहणारी कासवे मला नेहमीच आकर्षित करत आली आहेत, आपलं संपूर्ण आयुष्य खोल समुद्रात घालवणारी ही कासवं फक्त अंडी घालण्यासाठी किनाऱ्यावर येतात आणि अंडी घालून पुन्हा अथांग सागराचा एक भाग होण्यासाठी निघून जातात. साधारणपणे जेव्हा कासवाच्या मादीच्या पोटात अंडी तयार होतात, त्या मोठ्या संख्येने समुद्रकिनारी यायला सुरू करतात. पाण्यापासून बऱ्यापैकी लांब वाळूमध्ये ह्या माद्या खोल खड्डा खणतात आणि त्यात जवळपास शंभर एक अंडी घालतात. ही अंडी मऊ आणि रबरासारखी असतात त्यानंतर त्यांचे कवच कठीण होते आणि ती टेबल टेनिसच्या बॉल सारखी दिसतात. ह्या अंड्यांवर वाळू सारून ती अंडी पूर्णपणे गाडून त्यांना उबण्यास सोडून सर्व माद्या पुन्हा समुद्रात परततात. ह्या खड्यांना कासवाची घरटी (nest) म्हणतात आणि ज्या किनाऱ्यांवर कासवे वर्षानुवर्षे अंडी घालण्यास येतात त्या जागांना कासवांच्या घराट्यांची जागा ( nesting sites) म्हणतात.

आपल्या रायगड जिल्हात अश्या काही जागा प्रसिद्ध आहेत जसे हरिहरेश्वर, श्रीवर्धन आणि काही अंशी मुरुड समुद्र किनारा. रत्नागिरी मधील वेळास समुद्रकिनारा तर अनेकांना माहीत असेलच.

आपल्या इथे साधारणपणे ऑलिव्ह रिडले (Olive Ridley), लॉगरहेड (loggerhead), लेदर बॅक (leather back) आणि ग्रीन सी टर्टल ( green sea turtle) ही समुद्री कासवे आढळून येतात.

आज जी कथा मी तुम्हाला सांगणार आहे ती ग्रीन सी टर्टल ची आहे.

तर झालं असं की जुलै महिन्यातल्या एका रविवारी सकाळी मला अभिजीत सातमकर ह्यांचा फोन आला, डॉ. घरी आहात काय? इथे हिराकोटला एक मोठं कासव अडकलं आहे, त्याला काढावं लागेल आता कासव पाण्यात अडकेल कसं आणि त्याला काढायचं कशासाठी असा मी विचार करतच होतो की दुसरा फोन श्री. यतीन घरत ह्यांचा आला, डॉ. साहेब, हिराकोट तलावात एक खूप मोठं कासव आहे आणि ते पाण्याखाली जात नाहीये, बहुदा जखमी असावं त्याला मदतीची गरज आहे. तोच तिसरा फोन माझा जवळचा मित्र कुणाल साळुंखे ह्याचा आला, प्रसाद तुला हिराकोट जवळून कॉल आला होता का? मला फोटो आला आहे, सी टर्टल आहे बघ जरा जाऊन. कुणाल अनेक वर्षे वन्यप्राणी बचाव आणि त्यांचा शास्त्रीय अभ्यास करत आहे. ऑर्गनायझेशन फॉर वाईल्डलाईफ स्टडीज (OWLS) ह्या संस्थेचा तो अध्यक्ष आहे. फणसाड अभयारण्यात गव्यांचा पहिला शोधनिबंध त्याच्या नावावर आहे. त्यामुळे जेव्हा कुणाल म्हणाला सी टर्टल आहे तेव्हा मात्र मला सगळ्या गोष्टी स्पष्ट झाल्या! अनेकांना हिराकोट ही काय भानगड आहे ह्याचा बोध झाला नसावा, हिराकोट हा तलाव अलिबागमध्ये स्थित आहे. त्याच्या चारही बाजूंना महत्वाच्या वास्तू आहेत, जसे जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस मुख्यालय, वनविभागाचे अलिबाग डिविजन ऑफिस आणि उच्च पदस्थ शासकीय अधिकारी ह्यांची निवासस्थाने इत्यादी. हा तलाव गोड्या पाण्याचा आहे आणि सुशोभीकरण केल्याने त्याला सगळ्या बाजूने तटबंदी आहे आणि तलाव चांगलाच खोल आहे.

समुद्री कासव गोड्या पाण्यात जात अथवा राहत नाहीत, तसचं हिराकोट तलाव समुद्राशी कुठल्याच मार्गाने जोडलेला नाही. तर हे कासव ह्यात आलं कसं हे कोडं काही मला उलगडेना. त्वरित हालचाल करणं आवश्यक होतं, मी लगेच ओमकार कामतेकर, पारस घरत आणि अदिती सगर ह्यांना फोन केले आणि तलावावर पोहोचण्यास सांगितले. ओमकार, पारस आणि अदिती आमच्या ग्रुपची खरी क्विक रिस्पॉन्स टीम आहे! कुठेही कुठलाही साप किंवा इतर वन्यप्राणी आढळला अथवा आजारी वा जखमी असल्याची खबर मिळाली, की रात्र-दिवस, उन-वारा पाऊस ह्या कशाचीही पर्वा न करता ही त्रयी सर्वात आधी स्पॉट वर पोचते आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने अतिशय नियोजनबध्द rescue conduct करते. चांगलं कार्य करायला चांगले सहकारी सुद्धा लागतात आणि मी स्वतःला खरंच भाग्यवान समजतो की असे सहकारी मला लाभले आहेत.

मी तलावाशी पोहोचलो आणि पाहिलं की कासव बराच वेळ काही हालचाल न करता तलावाच्या एका कोपऱ्यात तरंगत होतं, मी अलिबागचे उप वनसंरक्षक (DCF) श्री आशिष ठाकरे साहेबांना फोन करून सगळी माहिती कळवली, त्यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी श्री समीर शिंदे (RFO, mangrove cell) साहेबांशी बोलून घेण्यास सांगितले, कासवावर इथे काही उपचार करणे शक्य नाही त्यामुळे त्याला मोठ्या सेटअप मध्ये शिफ्ट करणे आवश्यक होते, शिंदे साहेबांनी लगेच संबंधित कर्मचाऱ्यांशी बोलून गाडी उपलब्ध केली परंतु तिला येण्यास थोडा वेळ होता. आता प्रश्न होता कासवाला बाहेर काढण्याचा! वनविभाग किंवा बाकी सरकारी यंत्रणा ह्यांच्या कडे बोट उपलब्ध नव्हती त्यामुळे तलावात उतरून कासवाला बाहेर काढण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. रेलिंगच्या पलीकडून मी हळूच तलावात उतरलो आणि सावकाश पोहत त्याच्याजवळ पोहोचलो, अलगद डाव्या हाताने त्याला आधार देऊन किनाऱ्याकडे निघालो आणि इतकावेळ निपचित पडलेल्या कासवामध्ये अचानक चेतना संचारली! ते लागलं धडपड करायला! कसंबसं एका हाताने पाणी कापत एकदाचा भिंतीपाशी पोचलो आणि त्याला उचलून वर ठेवलं. अभिजीत, यतीन दादा, ओंकार आणि अदिती तयार होतेच त्यांनी ताबडतोब त्याला जवळच्या हिरवळीवर नेऊन ठेवलं. बराच वेळ थंडगार पाण्यात राहिल्याने कासव मंद झालं होतं, म्हणून त्याला बास्किंग देणं गरजेचं होतं आम्ही थोडावेळ त्याला उन्हात बसू दिले आणि पुढची फोनाफोनी सुरू झाली.

पुण्याला RESQ नावाची एक संस्था वन्यप्राणी बचाव आणि उपचार ह्यांचं उत्कृष्ठ काम करते आहे. त्यांच्या सेंटरमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित पशुवैद्यकीय डॉक्टर हे दोन्ही असल्याने कासव त्यांच्याकडे पाठवायचे ठरले. नेहा पंचामिया आणि तूहिन सातारकर ह्या सगळ्या गोष्टी खूप चांगल्या प्रकारे हाताळतात. त्यांच्याशी बोलणं करून मी आणि अदितीने कासवाला दोन मोठ्या चादरींमध्ये गुंडाळलं, ओंकार समुद्रावर जाऊन एक गॅलन समुद्राच पाणी घेऊन आला, त्या चादरी त्या पाण्याने भिजवून आम्ही कासव गाडीत ठेवलं आणि वनविभागाच्या कार्यालयात घेऊन निघालो.

कासवाला बरेच दिवस पुण्याला ठेवावं लागणार होतं त्यासाठी अजून समुद्राच पाणी लागणार होतं, त्यामुळे ओंकार समुद्रावर जाऊन दोन मोठे गॅलन अजून पाणी घेऊन आला, आवश्यक पंचनामा आणि पत्रव्यवहार करून त्याला वनविभागाच्या गाडीतून पुण्याला रवाना करण्यात आलं.

पण ते तलावात आलं कसं हा प्रश्न अजून अनुत्तरीतच होता! मग आम्ही जरा गुप्तहेरांच्या भूमिकेत शिरून चौकशी सुरू केली तेव्हा समजलं की ते कासव वाहत समुद्रकिनारी आलं होतं, दोन तरुण पहाटे त्याला घेऊन चालले असताना त्यांना पोलिसांनी हटकलं, तर हे तलावातून बाहेर आलंय परत सोडायला चाललो आहे अशी बतावणी करून त्यांनी ते तलावात टाकलं आणि तिथून काढता पाय घेतला होता!!

ग्रीन सी टर्टल हे एक दुर्मिळ समुद्री कासव असून आपल्याकडे ते सहजासहजी आढळून येत नाही, केवळ आजारी असल्याने ते वाहत वाहत अलिबागला आलं आणि ह्या सगळ्या गोष्टी घडल्या!

त्याच्या फुफ्फुसाला जंतूसंसर्ग झाल्याने छिद्र पडले होते आणि त्यातून हवा त्याच्या शरीरात कोंडली जात होती त्याला फ्लोटिंग सिंड्रोम असं म्हणतात, त्याचमुळे त्याला पाण्याखाली जाणं शक्य होत नव्हतं. दुर्दैवाने प्रयत्नाची पराकाष्ठा करून सुद्धा काही दिवसांनी त्याचा मृत्यू झाला. हिरवे समुद्री कासव कठीण कवचाच्या कासवांच्या प्रजाती मधील सर्वात मोठे कासव समजले जाते. शरीराच्या मानाने डोके लहान असते. लांबीला हे कासव १२० सेंटिमीटर तर वजनाला १३५ ते १६० किलो भरते. पाठीवरचे कवच अंडगोलाकर असून त्याचा रंग काळा, राखाडी, तपकिरी किंवा हिरवा असतो. पोटाखालचा भाग पिवळसर रंगाचा असतो. हे कासव मुख्यत्वे सागरी गवत आणि शेवाळ खाते ज्यामुळे त्याच्या चरबिला हिरवट रंग प्राप्त होतो आणि त्यामुळे त्याला ग्रीन सी टर्टल म्हंटले जाते.

ह्याचा समावेश वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अधिसूची क्रमांक १ मध्ये होतो आणि IUCN च्या endengered यादी मध्ये होतो ज्याचा अर्थ ही जात लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. ■■



## रंगवर्षा...

वैष्णवी कुलकर्णी

अंगोपांगी फुलू लागलेला निसर्ग वसंतगान गात राहतो आणि त्या गानात हरपलेला संवेदनशील आणि निसर्गप्रेमी माणूस तेच रंग, तीच ऊर्जा अंगी बाणवत मोहरत राहतो. फुलणारे सगळे रंग आपल्या अंगी माखून घेण्याचा, ते मिरवण्याचा, त्यात चिंब होण्याचा आणि बहराशी तादात्म्य पावण्याचा एक प्रयत्न म्हणजेच रंगपंचमीचे साजरीकरण... हे विविधरंगी वर्ख लावलेली प्रत्येक कुडी श्रीकृष्णमय होऊन जाते. त्याच्या भक्तीत हरवते.

रंगपंचमी हा सण होळी, धुलिवंदन, रंगोत्सव, धुळवड अशा विविध नावांनी साजरा केला जातो. काही ठिकाणी होळीनंतरचा दुसरा दिवस रंगपंचमी साजरी होते तर काही ठिकाणी होळीनंतरचे पाच दिवस धुळवडीचा आनंद लुटला जातो. या निमित्ताने सर्वजण एकत्र येतात आणि रंगपंचमीचा आनंद लुटतात. या सणाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व निरनिराळ्या पद्धतीने सांगण्यात येत असले तरी रंगपंचमी हा वसंतोत्सवाचाच एक भाग आहे. या काळात सृष्टीत अनेक बदल होत असतात. झाडाची सुकलेली पाने गळून नवी पालवी फुटत असते. त्यामुळे निसर्गातही रंगाची उधळण सुरू असते. याचे एक प्रतीक म्हणून रंगपंचमी साजरी केली जात असावी. शिवाय या काळात उन्हाची काहिली वाढू लागलेली असते. त्यामुळे हिवाळ्यातून उन्हाळ्यात प्रवेश करताना वातावरणात होणारा दाह कमी करण्यासाठी हा सण साजरा केला जात असावा. रंगपंचमीला रंगासोबतच एकमेकांच्या अंगावर पाणी उडवण्याचीही पद्धत आहे. असं म्हणतात की, द्वापारयुगात बाळकृष्ण गोप-गोपिकांवर रंगमिश्रित पाणी उडवून हा सण साजरा करत असे. आजही रंगपंचमीच्या रूपात तिच प्रथा पाळली जाते. या सणामुळे आजही नातेवाईक, मित्रमंडळी एकत्र येतात आणि आनंद लुटतात. थोडक्यात, सर्वांना एकत्र आणण्यासाठीच या सणाची निर्मिती केली गेली असावी.

रंगपंचमीला धार्मिक महत्त्व असल्यामुळे सर्वात आधी राधा-कृष्णाच्या प्रतिमेला आणि घरातील इतर देवतांना भक्तिपूर्वक रंग लावला जातो. त्यानंतर घरातील मोठ्यांना सन्मानपूर्वक रंग लावला जातो. लहान मंडळी मोठ्यांच्या कपाळावर रंगाचा टिळा लावून अथवा त्यांच्या चरणांवर रंगाचे बोट लावून या सणाला सुरूवात करतात. देवाची पूजा आणि घरातील मोठ्यांना आदरपूर्वक रंग लावल्यावर सर्वांसोबत रंगांची उधळण केली जाते. एकमेकांच्या अंगावर पाणी उडवत हा सण साजरा केला जातो. या दिवशी घरात गोडाधोडाचे पदार्थ बनवले जातात. महाराष्ट्रातील कोकण प्रांतात होळी ते रंगपंचमी या दिवसांमध्ये शिमगोत्सवही साजरा केला जातो. होळीनंतर काही दिवस गावोगावी ग्रामदेवतेची पालखी आणि जत्रोत्सव साजरा केला जातो. घरोघरी येणाऱ्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी चाकरमानी खास कोकणातील घरी जातात. पालखी नाचवताना पाहणे हे डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. रंगपंचमी खेळताना भगवान शिवशंकराला प्रिय असणारी भांग पिण्याची पद्धतही काही ठिकाणी आहे. त्याचप्रमाणे एकमेकांना थंडाईसारखे पदार्थही दिले जातात. एकूणच रंगांची दुनिया मोठी न्यारी असते.

प्रत्येकाच्या आयुष्यात रंगांचे वेगळेच महत्त्व असते. रंगांशिवाय विश्वाची कल्पनाच करवत नाही. सगळीकडे रंगांचे साम्राज्य पसरलेले. उगवतीचे रंग वेगळे, मावळतीचे रंग वेगळे, नव्हाळीचे वेगळे, ताजेपणाचे रंग वेगळे... रंगांच्या या विश्वाचा एक भाग होऊन राहणे तेवढेच मनभावन. म्हणून जन्मापासून रंगांशी जोडलेले नाते अखेरच्या श्वासापर्यंत कायम रहाते.

अगदी तान्हे बाळही रंगांची भाषा ओळखू लागते. पाळण्यावर टांगलेल्या रंगीबेरंगी खेळण्याकडे त्याची नजर वळते. रंगीत दुपट्याचा काठ हातात धरुन ते मोहक हालचाली करायला लागते. कुठल्याही रंगीत वस्तूंचा ताबा मिळवण्यासाठी ते पोटावर सरकू लागते. अशाच एका शक्तिवान बालकाने आकाशात उगवलेल्या तेजस्वी सूर्यबिंबाकडे आकर्षित होत त्याला कवेत घेण्यासाठी उड्डाण केले होते, हे आपण पुराणकथांमध्ये ऐकतो. म्हणजेच रंगांकडे आकृष्ट होणे हा प्रत्येक सजिवाचा नैसर्गिक स्वभाव आहे. कुठलाही जीव याला अपवाद नाही. निसर्गाने माणसापेक्षा अन्य जीवजंतूनाच रंगाचे भरभरुन दान दिले आहे. बघा ना, पक्ष्यांच्या पंखांवरचे एकमेकांमध्ये बेमालुम मिसळलेले आकर्षक रंग, मोराच्या भरगच्च पिसाऱ्यावर अव्याहत साजरा होत असणारा रंगोत्सव, सागरात मुक्तपणे विहरणाऱ्या माशांच्या शरीरावर होत असणारा रंगांचा मनमोहक आविष्कार, रंगांची रांगोळी मिरवणारी वृक्षवल्ली. या सर्वापुढे आपली निरस त्वचा काहीच नाही. हे जीव आपले अस्तित्व टिकवण्यासाठी त्याचप्रमाणे मिलनाच्या वेळी जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी या रंगांचा बेमालूम उपयोग करुन घेत असतात. म्हणजेच निसर्गातील प्रत्येक घटक या नैसर्गिक रंगपंचमीचा नित्य आनंद घेत असतो. तो वसंतात बहरत असतो. पानापानातून फुलत असतो. जीर्ण त्वचेचा, पंखांचा त्याग करुन नव्या नव्हाळीचा आनंद घेत असतो. मात्र आपण यापासून थोडे दूर आहोत. म्हणूनच निसर्गात साजऱ्या होणाऱ्या या आनंदोत्सवात सहभागी होण्यासाठी रंगपंचमीचे प्रयोजन झाले असावे आणि यानिमित्त रंगात रंगून जाण्याचा रिवाज पडला असावा.

धुळवड, रंगपंचमीचा उत्साह होळीनंतर वाढत जातो. होळीच्या दुसऱ्या दिवशी साजरी होते ती धुळवड. होळीच्या राखेत पाणी मिसळून बनणारा रंग अंगाला फासून साजरी होणारी धुळवड. होळीसाठी वापरली जाणारी लाकडे औषधी असतात. साहजिकच विलीन झाल्यावर ती मातीही औषधी गुणांनी युक्त बनते. त्वचाविकार आणि आरोग्यसंवर्धन या हेतूने औषधी गुणांनी युक्त असे हे मृत्तिकास्नान लाभकारक आहे. म्हणूनच धुळवडीच्या दिवशी चिखल माखून घेत आनंद व्यक्त केला जातो. पण आता हा रिवाजही मागे पडतोय. उत्तर भारतीयांचे अनुकरण करत होळीच्या दिवशीच रंग खेळला जातो. अर्थात त्यात वाईट काहीच नाही. पण घातक रंगांचा वापर टाळणे, या निमित्ताने असहाय्य तरुणींना सतावणे, बळजबरीने रंग लावणे चुकीचे आहे. कृष्णवेड्या भारतात कृष्णाच्या रंगारंग होळीची आठवण म्हणून होळी साजरी होते. होळी गातात. होळी खेळतात. एकमेकांना कान्हा आणि गोपीस्वरुप मानून रंग लावतात. पण गोपींना माखून काढणाऱ्या कान्हानेच त्यांच्या रक्षणासाठी गोवर्धन करंगळीवर उचलला होता हे विसरून चालणार नाही. आपल्या कृपाछत्राखाली घेत त्याने सोळा सहस्त्र नारींना अभय दिल्याचेही विसरून चालणार नाही. तेव्हा स्वत:ला रासरंगात रंगवू इच्छिणाऱ्या प्रत्येकाने वेळ पडल्यास कृष्णाच्या या पराक्रमाचे प्रदर्शन करण्यासाठी सज्ज रहावे हे बरे.

धुळवडीनंतर साजरी होते ती रंगपंचमी. एकमेकांवर रंगांचे शिंपण करुन हा सण साजरा केला जातो. सर्वांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या या सणाच्या निमित्ताने एकमेकांवर नानाविध रंगांची उधळण करायची आणि एका आगळ्या वेगळ्या स्वानंदाच्या रंगात न्हाऊन जायचे हे आपल्याला साधायचे असते. या सणाचा गोडवा सांगावा तेवढा थोडा आहे. प्रत्येक रंगाला एक अर्थ आहे. पांढरा रंग शांततेचा, लाल रंग धोक्याचा, हिरवा रंग संपन्नतेचं प्रतीक आहे. भगवा रंग त्यागाचे प्रतीक आहे. प्रतिकांबरोबर प्रत्येक रंगांला स्वभावही असतो. माणसाप्रमाणेच प्रत्येक रंगाचे वैशिष्ट्य वेगळे. त्याचा गुणधर्म वेगळा. काही रंग सौम्यता पसरवणारे तर काही थोडे उग्र भासणारे. काही कुठल्याही द्रावणात सहज विरघळणारे तर काही स्वत:चे वेगळे अस्तित्व राखणारे. काही स्वत: उष्णता धारण करुन आजूबाजूला थंडावा देणारे तर काही उष्णता उत्सर्जित करुन स्वत: थंड राहणारे. ही सगळी स्वभाववैशिष्ट्ये माणसांच्या स्वभावाशी सहज जोडली जातात. म्हणूनच कदाचित चित्त विचलीत झालेल्या रुग्णांसाठी कलर थेरपी जास्त उपयुक्त सिद्ध होत आहे. काही रंगांचे सानिध्य मनोवस्था ठिकाणावर आणण्यास उपकारक सिद्ध होते, हे आता शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झाले आहे. म्हणूनच रंगाशी फारकत घेणे कधीही परवडणारे नाही. कोणी तसा प्रयत्नही करु नये.

एखाद्या चित्रकाराची पॅलेट पाहिली आहे कधी? तो बाटलीतले हवे तेवढे रंग आपल्या पॅलेटवर घेतो. ते हवे त्या प्रमाणात प्रवाही करतो. नंतर ब्रशच्या साह्याने पॅलेटच्या छोट्या रंगमंचावर रंगांचा छोटेखानी खेळ रंगतो. ब्रशच्या तालावर नाचत असताना, रंग एकमेकांमध्ये मिसळत असताना हलके हलके एक नवा रंग, एक नवी शेड तयार होत असते. ही रंगपंचमी अनुभवणे खरंचच अनोखा आनंद देऊन जाते. म्हणूनच रंगांमध्ये न्हाऊन निघा. प्रत्येक दिवशी रंगपंचमी साजरी करा. ■■



> कोरोनाचं वादळ आलं आणि जोरदार वाऱ्यानं झाडोरा विस्कटून जावा त्याप्रमाणे जवळपास प्रत्येकाचं आयुष्य विस्कटून गेलं. पण म्हणून जगण्यातल्या आनंदाला विन्मुख व्हावं? 'हरिदूता का विन्मुख व्हावे' या काव्यपंक्तींच्या धर्तीवर या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असं असणार. म्हणूनच २० मार्चच्या जागतिक आनंद दिवस साजरीकरणाविषयीचं वृत्त वाचत असताना आपणही आनंदाभिमुख राहण्याचा संकल्प सोडायला हरकत नाही.

## वन-जल संवर्धनाचं आव्हान

२१ मार्च हा दिवस जागतिक वन आणि जल दिन म्हणून साजरा होतो. सध्याच्या विज्ञानयुगात तंत्रज्ञानाधिष्ठीत जीवनशैलीचा स्वीकार करत असताना माणसाकडून या दोन्ही निसर्गघटकांप्रती अक्षम्य हेळसांड होत आहे. जल आणि वायू प्रदूषण वाढत आहे. आयक्यूएआर या स्विस संघटनेने मध्यंतरी जाहीर केलेल्या अहवालानुसार जगातल्या सर्वाधिक प्रदूषित ३० शहरांपैकी २२ शहरं भारततली आहेत. आज आपल्या आजूबाजूचं वनक्षेत्र आक्रसत आहे. जलस्त्रोत कमी होत आहेत. शहरांमधून वाहणाऱ्या नद्यांची डबकी झाली आहेत. कुठे जलपर्णीमुळे संपूर्ण पात्रावर नकोशी हिरवी चादर पसरल्याचं दिसत असून नदीतल्या जलचरांचं अस्तित्व नष्ट होत आहे. कारखान्यांमधल्या सांडपाण्यावर प्रक्रिया न करता नदीत सोडण्याचं प्रमाण प्रचंड असल्यामुळे जलसंपत्ती विनाशाच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे. जमिनीतल्या पाण्याचा स्तर सतत खाली जात आहे. विंधन विहिरींद्वारे भरमसाठ उपसा होत असल्यामुळे क्षारयुक्त पाण्याचा वापर करणं क्रमप्राप्त ठरत असल्यामुळे बऱ्याच भागातल्या रहिवाशांना आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागत आहे. एकंदरच सध्या पाणीप्रश्न अनेक पातळ्यांवर बिकट होत असल्यामुळे तिसरं महायुद्ध पाण्यावरुन पेटण्याचं भाकित खरं ठरण्याची शक्यता जाणवू लागली आहे. दुसरीकडे, वन्य जीव आणि माणसाच्या वाढत्या संघर्षाच्या तसंच पर्यावरण असंतुलनामुळे उद्‌भवणाऱ्या दुर्घटनांच्या रुपाने माणसाची कुकर्मंही आता समोर येऊ लागली आहेत. त्यामुळेच वन आणि जल संवर्धन आणि संरक्षणाची जबाबदारी उचलायला हवी.

# जाऊ आनंदाच्या गावी...

**मधुरा कुलकर्णी**

सामान्यांची अस्तित्वरक्षणाची लढाई हातघाईवर येत असताना आयुष्यातल्या आनंदाचा स्तर खालावणं ओघानंच आलं. त्यात दुष्काळात तेरावा महिना, म्हणतात त्याप्रमाणे कोरोनाचं वादळ आलं आणि जोरदार वाऱ्यानं झाडोरा विस्कटून जावा त्याप्रमाणे जवळपास प्रत्येकाचं आयुष्य विस्कटून गेलं. पुढचे काही दिवस तरी अडचणींचा आणि या निमित्तानं उभ्या राहिलेल्या प्रश्नांचा गुंता सुटण्याची चिन्हं दिसत नाहीत. पण म्हणून का आपण आनंदाला विन्मुख व्हावं? 'हरिदूता का विन्मुख व्हावे?' या काव्यपंक्तींच्या धर्तीवरचा हा प्रश्न स्वत:लाच एकदा विचारुन पहा बरं! उत्तर नक्कीच 'नाही' असं असणार. म्हणूनच एकीकडे २० मार्चच्या जागतिक आनंद दिवस साजरीकरणाविषयीचं वृत्त वाचत असताना आपणही आनंदाभिमुख राहण्याचा संकल्प सोडायला हरकत नाही. सुखाचा एक तर दु:खाचे शंभर या प्रमाणात विणलेल्या आयुष्याच्या वस्त्रात दु:ख पैशाला पासरीभर मिळणारच! हा तानाबाना विणीतले सगळे रंग आलटून पालटून आपल्यापुढे आणणार. काही रंग उन्हात प्रकर्षानं चकाकणार तर काही सावलीत खुलून दिसणार. त्या प्रत्येकाचा विचार करत बसलं तर संपूर्ण आयुष्य बेरंगी होण्यास वेळ लागणार नाही. म्हणूनच हाती आलेल्या प्रत्येक क्षणावर आनंद पांघरुण आयुष्य आपलंसं करणं आणि मनापासून जगणं हेच जीवनाला निखळतेनं सामोरं जाण्यामागचं खरं मर्म आहे.

काहींची वृत्ती मुळातच आनंदी असते. ते अगदी छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधू शकतात. एखादा रत्नपारखी पैलू पाडून साध्याशा रत्नाला झळाळी देतो तद्वत त्यांची आनंदी वृत्ती सामान्य आयुष्यावरही सोनेरी वर्ख चढवून जाते. लौकिकार्थानं मागे राहिलेले हे लोक आनंदाच्या परिमाणात मात्र खूप पुढे निघून गेलेले असतात. कारण मुळात आनंद कुठल्याही बाजारात विकत मिळत नाही, आधी उल्लेख केल्याप्रमाणे तो वृत्तीत असावा लागतो. ही वृत्ती असणारा माणूस एखाद्या रसाळ भजनात, एखाद्या चुटक्यात, एखाद्या चारोळीत, गाण्याच्या एखाद्या कडव्यात, रंगाच्या एखाद्या फटकाऱ्यात, गायकाच्या एखाद्या तानेत, वाद्याच्या एखाद्या झंकारात, निसर्गाच्या एखाद्या आविष्कारातही इतका पराकोटीचा आनंद शोधतो की त्याची पारायणं करण्यासाठी परत परत तो अनुभव घेत राहतो आणि पुन्हा तितकाच आनंद मिळवत राहतो. अशा प्रकारे चक्रवाढव्याजाच्या नियमानं त्याच्या आनंदावर आनंदाचं व्याज चढत जातं आणि आनंदाच्या तळ्यात आनंदाचेच तरंग उमटवत त्याचं आयुष्य हळूवार लाटा पसरवत जातं.

आजचं व्यवहारी जग आनंदी दिवस साजरा करताना उत्पन्न, निरोगी जीवन, सामाजिक अहवाल, स्वातंत्र्य, विश्वास आणि उदारता या निकषांच्या आधारे एखाद्या देशातले नागरिक स्वत:ला किती आनंदी समजतात याची पहाणी करुन एका तक्त्यात देशांची नोंदणी करतं. त्याप्रमाणे पहिले पाच देश सर्वात आनंदी तर शेवटचे पाच सर्वात दु:खी असं लेबल लावून एक अहवाल पूर्ण होतो. आश्चर्य म्हणजे जगातला सर्वात श्रीमंत समजला जाणारा अमेरिकेसारखा देश या यादीत पहिल्या पाचात दिसत नाही. म्हणजेच आपल्या अध्यात्मात मांडलेला आनंद आणि पैसा यांचा संबंध नसतो, हा विचार इथे सबळतेने स्पष्ट होताना दिसतो. या विचारधारेमुळेच भूतानसारख्या नागरिकांच्या आनंदीपणाचा स्तर महत्त्वाचा मानणाऱ्या आणि त्याच निर्देशांकाच्या आधारे देशाच्या विकासाची व्याख्या आधारभूत मानणाऱ्या देशाबद्दल आपल्याला



कु तू ह ल वाटतं. तेव्हा तेच परिमाण प्रमाण मानून आपणही त्यांचा आदर्श पुढे ठेवायला काहीच हरकत नाही.

अनेक विनोदवीरांनी आपल्याला हसायला शिकवलं, आनंद लुटायला शिकवलं आणि दैनंदिन जीवनातल्या व्यथा-विवंचना बाजूला ठेवून भरभरुन कसं जगायचं याचे अनौपचारिक धडे दिले. त्यामुळेच कधी काळी 'गंभीर' अशी असणारी मराठी माणसाची ओळख बदलली. आपण सकस आणि कसदार विनोदावर मनसोक्त हसलो. द्वयर्थी शब्दातली गंमत कळल्यावर एकच कल्लोळ केला. अनेक हास्यमहर्षींनी आपल्या स्थितप्रज्ञ आणि चिंताक्रांत चेहऱ्यावरील जाळ्यात हास्याचे रंग भरले. आपण वक्तृत्वातल्या विनोदावर हसलो, लेखनातल्या कोट्यांवर हसलो, कोपऱ्यातलं व्यंगचित्र पाहून हसलो. शारीरिक आणि वाचिक अभिनय पाहून हसलो. विदुषकाच्या फसव्या आविष्कारावर हसलो तसंच विनोदसम्राटाच्या चेहऱ्यावरच्या एखाद्या मिश्किल भावावरही हसलो. एकूण काय, तर जगताना समोर येणाऱ्या अडचणींवर मात करताना हास्यामुळे मिळणारे तणावमुक्तीचे क्षण हेच संचित आहे हे आता आपल्याला पुरतं उमगलं आहे. म्हणूनच दु:ख झाकून ठेवण्याच्या प्रयत्नात हसण्याचा गडगडाट दिवसेंदिवस वाढतोय.

आपण आनंदी असलो की ओठांवर आपोआप हळूवार हास्य येतं. म्हणजेच हसणं हा प्रयोग नाही तर निष्कर्ष आहे. हसणं ही मनस्वास्थ्य मिळाल्याची पोचपावती आहे. मिटलेले ओठ विलग होतात तेव्हा मनाचा कुठलासा कोपरा सुखावलेला असतो. कधी त्यामागे कारण असतं तर कधी कारण नसलं तरी या कमळाच्या पाकळ्या आपोआप उमलतात. अर्थातच त्यासाठी मन आनंदी असायला हवं आणि त्यासाठीच दु:खाचं मळभ दूर करण्याचं कसबही जमायला हवं. सुख-दु:ख या नाण्याच्या दोन बाजू आहेत. तेव्हा कुठली बाजू सतत समोर ठेवायची हे ठरवणंही गरजेचं आहे. सुखाची अनेक ठाणी आहेत, अनेक झरे आहेत. मनात आणलं तर आपणही त्याखाली भिजू शकतो आणि अवघं आयुष्य सुहास्य वदनानं राहू शकतो. आनंद आणि निरागस, निखळ आणि निर्मळ हसू कुठल्याही खजिन्यापेक्षा मौल्यवान आहे. कारण कितीही पैसे मोजले तरी ते काही मिळत नाही. आयुष्य पुढे सरकतं तसा अभ्यासाचा ताण वाढतो. मी-तू पणाची जाणीव होते. सुखाबरोबर दु:ख या स्वनिर्मित कल्पनेची ओळख होते. नंतरच्या काळात नियती नावाच्या अदृश्य शक्तीची विविध रूपं वेगवेगळ्या प्रकारे समोर येत जातात आणि परिस्थितीला सामोरं जाताना चेहऱ्यावरचं हसू आणि मनातला आनंद दुर्मिळ होतो.

कपाळावर आठ्यांचं आणि मनावर जबाबदारीचं ओझं वाढलं की हसणं, आनंद संकोचतो. देखल्या देवाला दंडवत या उक्तीप्रमाणे हसू येईलही; पण ते कसनुसं वाटतं, उपरं वाटतं. त्यात प्राण नसतो. ती केवळ एक शारीरिक क्रिया होऊन राहते. मुळात कोणत्याही साध्यासुध्या परिस्थितीत दु:ख शोधण्याची आणि त्यामुळे व्यथित होण्याची मानसिकता या निखळ आनंदाचा गळा घोटते आणि माणूस अधिकाधिक गंभीर होत जातो. म्हणूनच निखळ आनंद महाग व्हायला जेवढी परिस्थिती कारणीभूत आहे तेवढाच माणूस स्वत:ही. भौतिक सुखांच्या शोधापायी आणि हव्यासापोटी धावपळ वाढली तेव्हापासून माणसाच्या मनातला आनंद लोप पावायला सुरूवात झाली असं म्हणता येईल. ही सुखं मिळाली की आनंद होतो, नाही असं नाही, पण तो बराच फसवा असतो, अल्पजीवी असतो. कारण सुखाची भूक शमत नाही. लगेचच दुसऱ्या सुखाची भूक लागते आणि आनंदावर आरूढ होऊन असमाधान त्याला दाबून टाकतं. हे दुष्टचक्र कधीही न संपणारं! पण अशा परिस्थितीतही आनंद जपू शकणारे भाग्यवान म्हणावे लागतील. परिस्थितीचा दाह त्यांची प्रसन्नता जाळू शकत नाही. द्रव्याची चणचण अथवा कमतरता त्याचं हसू झाकोळून टाकू शकतं नाही. आपणही अशा भाग्यवानांच्या पंक्तीत बसण्याचा प्रयत्न करायला हवा. चला तर, मग आनंदी राहू या. ■■

# रक्तानंतर आता फुफ्फुसातही प्लास्टिक

> रक्तानंतर पहिल्यांदाच मानवी फुफ्फुसांच्या आत मायक्रोप्लास्टिक कणांची उपस्थिती आढळली आहे. शरीरात मायक्रोप्लास्टिक्सची उपस्थिती हे आणखी एका मोठ्या धोक्याचे संकेत आहे. त्यावरून असे दिसून येते की प्लास्टिकचे हे वाढते विष वातावरणातच नाही, तर आपल्या नसा आणि शरीराच्या अवयवांमध्येही विरघळले आहे. प्रदूषणाच्या या नव्या घातक धोक्याचा मागोवा.



**भास्कर खंडागळे**

आज पृथ्वीवर असे एकही ठिकाण नाही, जे वाढत्या प्लास्टिकपासून मुक्त आहे. मायक्रोप्लास्टिक्सचे हे कण उंच हिमालयापासून महासागराच्या खोलीपर्यंत आणि अगदी आर्क्टिक आणि अंटार्क्टिकसारख्या ठिकाणी पोहोचले आहे, जिथे मानवाचा पत्ता नाही. 'सायन्स ऑफ द टोटल एन्व्हायरन्मेंट' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनानुसार मायक्रोप्लास्टिकचे हे कण केवळ फुफ्फुसाच्या ऊतींच्या खोलीतच नाही, तर फुफ्फुसाच्या प्रत्येक भागात आढळून आले. शास्त्रज्ञांना हे कण १३ पैकी ११ रुग्णांच्या ऊतींमध्ये आढळून आले, ज्यामध्ये पॉलीप्रोपायलीन आणि पीईटी (पॉलीथिलीन टेरेफ्थालेट) सर्वात सामान्य आहेत. विशेष म्हणजे, पॉलीप्रोपीलीनचा वापर सामान्यतः पॅकेजिंग आणि पाईप्समध्ये केला जातो तर 'पीईटी' प्लास्टिक बाटल्यांच्या निर्मितीमध्ये वापरला जातो. ब्रिटनच्या संशोधकांच्या मते, हे मायक्रोप्लास्टिक कण श्वासाद्वारे फुफ्फुसात पोहोचले असण्याची शक्यता आहे. या अभ्यासात संशोधकांना मायक्रोप्लास्टिकचे ३९ कण आढळले. याशिवाय, संशोधनातून दिसून आले की, पुरुषांमधल्या नमुन्यांमध्ये किती तरी जास्त कण आढळून आले आहेत. संशोधकांना या नमुन्यांमध्ये एकूण १२ प्रकारचे पॉलिमर कण आढळले आहेत. संशोधनानुसार, प्लास्टिकच्या या ३९ तुकड्यांपैकी ११ फुफ्फुसाच्या वरच्या भागात, ७ मध्यभागी आणि २१ फुफ्फुसाच्या आतील भागात आढळून आले. याआधी 'जर्नल एन्व्हायर्नमेंट इंटरनॅशनल'मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनात शास्त्रज्ञांनी माहिती दिली होती की, हे म ायक्रोप्लास्टिक कण आपल्या रक्तातही सापडले आहेत. त्यांच्या अभ्यासात, शास्त्रज्ञांना दहापैकी आठ लोकांच्या रक्तात मायक्रोप्लास्टिकचे कण आढळले, जवळजवळ अर्ध्या नमुन्यांमध्ये पीईटी प्लास्टिक आढळले.

यापूर्वी, कॉर्नेल आणि उटाह स्टेट युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी केलेल्या अभ्यासात दिसून आले आहे की पॅकेजिंग वस्तू आणि सोड्याच्या बाटल्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचे छोटे कण हवेतून जगभर प्रवास करू शकतात. त्याचं शरीरात अस्तित्व असण्याआधीच पुरावे समोर आले आहेत. संशोधकांच्या म्हणण्यानुसार, हे मायक्रोप्लास्टिक कण वातावरणात गेल्यानंतर सुमारे सहा दिवस हवेत राहू शकतात. विशेष म्हणजे या काळात ते अनेक खंडांमध्ये जाऊ शकतात किंवा श्वासाद्वारे शरीराच्या अंतर्गत अवयवांमध्ये जाऊ शकतात. 'फ्लोरिडा स्टेट युनिव्हर्सिटी'ने केलेल्या अभ्यासात शास्त्रज्ञांना आढळून आले आहे की, प्लास्टिकचे हे सूक्ष्म कण शरीरात पोहोचल्याने पेशींच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो. एवढेच नाही, तर एकदा फुफ्फुसात पोहोचल्यानंतर हे कण फुफ्फ ुसाच्या पेशींच्या चयापचय आणि विकासावर परिणाम करू शकतात. ते पेशींच्या आकारावर परिणाम करून त्यांची हालचाल रोखू शकतात.

'जर्नल एन्व्हायरन्मेंट इंटरनॅशनल' मध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनातही न जन्मलेल्या मुलाच्या नाळेम ध्ये मायक्रोप्लास्टिक्स आढळले आहे. 'जर्नल ऑफ हॅझार्डस मटेरिअल्स लेटर्स'मध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनातून टूथपेस्ट, क्रीम इत्यादी दैनंदिन गोष्टींपासून आपले अन्न, हवा आणि पिण्याच्या पाण्यातून प्लास्टिकचे कण शरीरात जातात, असे समोर आले आहे. सुरुवातीला वरदान समजले जाणारे हे प्लास्टिक भविष्यात एवढ्या मोठ्या समस्येचे रूप धारण करेल, असे कोणाला वाटले नसेल. १९०७ मध्ये पहिल्यांदा सिंथेटिक प्लास्टिक 'बेकेलाइट'चे उत्पादन सुरू झाले. तथापि, १९५० पासून त्याचे उत्पादन वाढले. शास्त्रज्ञांचा अंदाज आहे की तेव्हापासून आम्ही सुमारे ८३० दशलक्ष टन प्लास्टिकचे उत्पादन केले आहे, जे २०२५ पर्यंत दुप्पट होण्याची अपेक्षा आहे. अशा परिस्थितीत, ही समस्या वेळोवेळी किती तीव्र होईल याची आपण कल्पना करू शकतो. अशा परिस्थितीत ही समस्या केवळ पर्यावरणासाठीच नाही, तर आपल्या आरोग्यासाठीही मोठा धोका आहे. त्यापासून बचाव करण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्लास्टिक प्रदूषण अत्यंत धोकादायक आहे. कारण त्याचे कण इतके लहान असतात, की ते रक्ताद्वारे शरीरात सहज पोहोचू शकतात. यावरून मायक्रोप्लास्टिकचा वाढता धोका लक्षात येऊ शकतो. ते आता पृथ्वीवर सर्वत्र अस्तित्वात आहे. जगातील सर्वात उंच ग्लेशियर्स असो किंवा सर्वात खोल महासागर; ते सर्वत्र असते.

वस्तुत: याआधीही रक्त आणि मानवी फुफ्फुसात खोलवर प्लास्टिकचे सूक्ष्म कण आढळून आले आहेत. मात्र आता मानवी नसांमध्ये पेंट आणि फूड पॅकेजिंगमध्ये वापरल्या जाणाऱ्या सूक्ष्म प्लास्टिक कणांच्या उपस्थितीमुळे हे स्पष्ट होते की वातावरणात वाढणारे त्याचे विष आपल्या नसांमध्ये विरघळले आहे. काही काळापूर्वी न जन्मलेल्या बाळांच्या नाळांमध्ये मायक्रोप्लास्टिक सापडले. आता ते शिरांमध्ये आढळून येणे ही गंभीर चिंतेची बाब आहे. अलिकडील अभ्यासात असा दावा करण्यात आला आहे की प्लास्टिक अधिक टिकाऊ बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांच्या संपर्कात आल्याने विशेषतः महिलांमध्ये मधुमेहाचा धोका वाढू शकतो. संशोधकांच्या म्हणण्यानुसार मायक्रोप्लास्टिक्स रक्तवाहिन्यांमध्ये घुसू शकतात का, हे यापूर्वीच्या कोणत्याही अभ्यासात तपासले गेले नव्हते. त्यांच्या मते, नसांमध्ये सापडलेले हे सूक्ष्म प्लास्टिकचे कण पाच वेगवेगळ्या प्रकारच्या प्लास्टिक पॉलिमरचे होते. ते पूर्वीपेक्षा वेगळे होते. त्यांच्या नसांमधील उपस्थितीमुळे आतील अस्तरांचे नुकसान होऊ शकते.


अमेरिकन केमिकल सोसायटीने केलेल्या याआधीच्या अभ्यासात, शास्त्रज्ञांना मानवी अवयवांच्या ४७ नमुन्यांमध्ये प्लास्टिकचे प्रदूषण आढळून आले. या अभ्यासात फुफ्फुसे, यकृत, प्लीहा आणि मूत्रपिंड यांच्या नमुन्यांमध्ये मायक्रोप्लास्टिक्स आणि नॅनोप्लास्टिक्स आढळून आले. 'केमिकल रिसर्च टॉक्सिकॉलॉजी' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासातही मायक्रोप्लास्टिक्समुळे शरीरातील पेशींच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो, असे स्पष्ट झाले आहे. संशोधकांच्या म्हणण्यानुसार, प्लास्टिकचे हे सूक्ष्म कण श्वासोच्छवासाद्वारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने शरीरात पोहोचतात, तेव्हा ते काही दिवसांमध्ये फुफ्फुसाच्या पेशी, चयापचय आणि विकासावर परिणाम करू शकतात. अभ्यासात असेही दिसून आले आहे, की हे मायक्रोप्लास्टिक्स जीवाणूंमध्ये प्रतिजैविक प्रतिरोधक क्षमता तीस पटींनी वाढवू शकतात. 'एनव्हायनर्मेंट इंटरनॅशनल' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनात संशोधकांनी यापूर्वीच पृथ्वीच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेले मायक्रोप्लास्टिक्स न जन्मलेल्या बालकांच्या नाभीसंबधीत सापडल्याचे समोर आणले आहे. ही अत्यंत चिंतेची बाब आहे, कारण गर्भाच्या विकासात नाभीसंबधीची भूमिका खूप महत्त्वाची असते. हे संशोधन रोमचे फेटेबेनेफ्रेटेली हॉस्पिटल आणि पॉलिटेक्निका डेल मार्शा विद्यापीठाने केले आहे.

१८ ते ४० वयोगटातील सहा निरोगी महिलांच्या विश्लेषणात चार प्लेसेंटामध्ये मायक्रोप्लास्टिक कण आढळले. या महिला गर्भधारणेदरम्यान सामान्य होत्या आणि त्यांनी सामान्य पद्धतीने मुलाला जन्म दिला. मायक्रोप्लास्टिक्स बाळाच्या बाजूला असलेल्या प्लेसेंटाच्या भागात आणि आईच्या बाजूला असलेल्या प्लेसेंटामध्ये गर्भाचा विकास होत असलेल्या पडद्यामध्ये आढळले. नाभीशी संबंधित भागामध्ये सापडलेल्या मायक्रोप्लास्टिकमध्ये कृत्रिम संयुग आढळून आले. बारापैकी नऊ तुकड्यांमध्ये कृत्रिम पेंट सामग्री आहे; ज्याचा वापर क्रीम, मेक-अप किंवा नेलपॉलिश बनवण्यासाठी केला जातो आणि तीन तुकड्यांना पॉलीप्रॉपिलीन म्हणून ओळखले जाते. संशोधकांनी केवळ चार टक्के नाळेचा अभ्यास केला असला तरी, हे स्पष्ट झाले की नाळेच्या आत मायक्रोप्लास्टिक्सची संख्या जास्त असू शकते. अभ्यासानुसार, सापडलेले निळे, लाल, केशरी आणि गुलाबी रंगाचे मायक्रोप्लास्टिक कण हे मूलतः पॅकेजिंग, पेंट किंवा कॉस्मेटिक्सचे होते. दहा म ायक्रॉनपर्यंतचे हे सर्व सूक्ष्म प्लास्टिक रक्तप्रवाहाद्वारे मुलाच्या शरीरात सहज प्रवेश करू शकतात. संशोधकांच्या मते हे कण आईच्या श्वासातून आणि तोंडातून गर्भापर्यंत पोहोचले असावेत. सूक्ष्म प्लास्टिकच्या कणांमध्ये पॅलेडियम, क्रोमियम, कॅडमियम यासारखे विषारी जड धातू असतात. हे प्लास्टिकचे कण इतके लहान आहेत की ते सामान्य डोळ्यांनी दिसणे अशक्य आहे. ते रक्ताद्वारे शरीरात सहज पोहोचू शकतात.

एका संशोधनात आढळून आले की अन्नाच्या एका मोठ्या ताटात सूक्ष्म प्लॅस्टिकचे सरासरी ११४ कण असतात. या अहवालानुसार, ब्रिटनमधील व्यक्ती दर वर्षी अन्नातून प्लास्टिकचे ६८ हजार ४१५ सूक्ष्म कण गिळते. याचा अर्थ असा की आपल्या शरीरातील प्रत्येक स्नायूसाठी, आपण अन्नाद्वारे दर वर्षी प्लास्टिकचे किमान दोन सूक्ष्म कण घेतो. वातावरणात तरंगणाऱ्या प्लास्टिकच्या कणांच्या अंतर्ग्रहणाचा आकडा यापेक्षा वेगळा आहे. प्लास्टिकच्या रसायनांमुळे किंवा कणांमुळे होणारी जळजळ पाचन अवयवांना नुकसान पोहोचवू शकते. म्हणूनच सूक्ष्म प्लास्टिक मानवी शरीरात जाण्यापासून रोखण्याचा सर्वोत्तम आणि प्रभावी मार्ग म्हणजे प्लास्टिकचं उत्पादन आणि वापर कमी करणे. त्या दृष्टीने आता विचार व्हायला हवा. ■■

## संघर्ष आणि संघर्ष

-कवी मनीष आझाद



जेव्हा क्रांत्या मार्क्सच्या डोळ्यासमोर
एक एक करून 'पराभूत' झाल्या होत्या!
जेव्हा मार्क्सला आपला कुठला देश नव्हता
आपले कुठले घर नव्हते
त्याच्या डोळ्यासमोर त्याची मुले तडफडून
मरण पावली होती
त्याची सर्वस्व असलेली 'जेनी'
त्याला सोडून निघून गेली होती!
तेव्हासुद्धा मार्क्सने क्रांतीच्या नव्या
आवृत्तीची पटकथा लिहिणे सोडले नव्हते!
जेव्हा बोटे थकून जायची
पाय लोखंडाप्रमाणे जड होत असत
तेव्हा मार्क्स सावकाशपणे उठायचा
आणि आपल्या प्रिय मित्राला,
समुद्राला भेटायला यायचा.
मार्क्सला पाहताच जणू समुद्र त्याची
गळाभेट घेण्यासाठी उसळायचा
आणि त्याला आपल्या प्रेमात चिंब
भिजवून परतायचा.
मार्क्स आपल्या खोल डोळ्यांनी
समुद्राला असा काही बघायचा
की खळबळ माजवणाऱ्या समुद्राच्या
खोल खोल अंतरंगात लपलेल्या
भविष्यातील क्रांत्यांना पाहाण्याचा
जणू तो प्रयत्न करीत असायचा!
एके दिवशी
अचानक तिथे बसलेल्या,
समुद्राला न्याहाळणाऱ्या
एका पोक्त मजूराने विचारवंताच्या
अविर्भावात मार्क्सला असेच विचारले,
अखेर जीवनाचा अर्थ काय आहे?
मार्क्सने त्याच्याकडे खोल नजरेने पाहिले मग
दीर्घ श्वास घेतला आणि
त्याचवेळी समुद्राची उत्तुंग लाट मार्क्सच्या
दिशेने धावली!
मार्क्स त्या उसळी घेत असलेल्या
विशाल लाटेला भिडत म्हणाला,
जीवन म्हणजे,
संघर्ष! संघर्ष! आणि फक्त संघर्ष!

**मराठी अनुवाद - भरत यादव**

**निवडक**

## हाथ जोडो अभियान

**कोर्लई :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या हाथसे हाथ जोडो जनसंपर्क अभियान अंतर्गत व रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या सुचनेनसार रविवार (दि. १९) सायंकाळी ५.०० वा. नागरिकांच्या घरोघरी जाऊन हाथसे हाथ जोडो अभियानार्तगत संपर्क साधणार आहेत. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे चिटणीस श्रीरंग बारणे,ॲड.प्रवीण ठाकूर, मिलींद पाडगावकर, राजा ठाकूर, ॲड.श्रध्दा ठाकूर, मार्तंड नाखवा, अखलाक शिलोत्री उपस्थित राहणार आहेत.

## रुग्णवाहिकेचे हस्तांतरण

**पनवेल :** एसबीआय बँकेच्या २०२३ च्या सीएसआर फंडातून महापालिकेस बेसिक लाईफ सपोर्ट ही रुग्णवाहिका देण्यात आली आहे. या हस्तांतरणाच्या कार्यक्रमावेळी एसबीआय बँकेचे जनरल मॅनेजर मनोजकुमार सिन्हा यांनी आयुक्त गणेश देशमुख यांना प्रतिकात्मक किल्ली देऊ केली. यावेळी उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय आरोग्य् अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मंगेश गावडे, निलेश नलावडे, डॉ.वैभव विधाते, सनातन मिश्रा, धर्मेंद्रकुमार सिंग, उपस्थित होते.

## ज्ञानेश्वरीचे पारायण सुरु

**सुकेळी:** ऐनघर येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन रविवार दि. १९ ते २२ मार्च रोजी नारायण वाजे अलिबागकर ( मठाधिपती पंढरपूर) तसेच दत्ताराम कोल्हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाची सुरुवात रविवारी सकाळी घटस्थापना, दिपप्रज्वलन व ध्वजारोहण करुन होणार आहे. दैनंदिन कार्यक्रमांमध्ये काकड आरती, ज्ञानेश्वरी वाचन, हरिपाठ, किर्तन, जागर होणार आहे.

## मुद्रा संग्रहालयाला भेट

**माणगाव :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये प्राचीन काळापासून चालत आलेल्या विविध मुद्रांबद्दल जनजागृती करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना शेअर बाजारात ट्रेडिंग कशा पद्धतीने केली जाते याची ओळख करून देण्यासाठी महाविद्यालयातर्फे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुद्रा संग्रहालय या ठिकाणी औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली होती. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना विविध मुद्रांची, चलनाची ओळख झाली.

## महिलांची आरोग्य तपासणी

**पनवेल :** चांगले आरोग्य हीच खरी संपत्ती हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचालित श्री. बापूसाहेब डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन नवीन पनवेल यांच्या माध्यमातून इंटरनल क्वालिटी ॲन्शुरन्स सेल (आयक्यूएएस) अंतर्गत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून (शनिवार दि.१८) पॉलिस्ट्रिक ओव्हरी सिंड्रोम व महिलांची आरोग्य तपासणी शिबीर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# थकबाकीदारांचे धाबे दणाणले

### नगरपंचायतीने नळ कनेक्शन तोडण्याचा उचलला बडगा

*माणगाव । वार्ताहर ।*

*नागरी सुविधांची माणगाव नगरपंचायतीकडून अपेक्षा धरणाऱ्या नागरिकांना पाणीपट्टी कर व मालमत्ता कर भरण्यास नगरपंचायतीने तगादा लावला आहे. गेली दहा वर्षापासून अनेक बिल्डिंग, कॉम्प्लेक्स मालकांनी पाणीपट्टी कर थकविल्यामुळे नगरपंचायतीने या बड्या सदनिकाधारकांना त्वरित पाणीपट्टी कर भरावा यासाठी आगाऊ नोटीस दिली होती. मात्र, या नोटीसीची दखल न घेणाऱ्यांचे नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई सुरु केल्याने बड्या सदनिकाधारकांचे धावे दणाणले आहेत.*




शहरात अनेक मोठ्या सदनिका आहेत. यापैकी बहुतांशी सदनिका धारकांनी गेली दहा वर्षापासून नगरपंचायतीचा पाणीपट्टी कर भरला नसल्याने नगरपंचायतीने या सदनिकाधारकांना पाणी कनेक्शन तोडण्याबाबत नोटीस दिल्या होत्या. मात्र, अनेक सदनिकाधारकांनी पाणीपट्टी कर भरण्याकडे पाठ फिरवली. नगरपंचायतीने घालून दिलेल्या मुदतीनंतर ही पाणीपट्टी कर भरला नसल्याने नगरपंचायतीने माणगावमधील आरोग्य बिल्डिंग दत्तनगर, जालगावकर जुनी चाळ गार्डनजवळ कचेरी रोड, स्काय व्हीव्यू कचेरी रोड, तनजीन कॉम्प्लेक्स जुने माणगाव, पल्लवकर कॉम्प्लेक्स रेल्वे स्टेशन नाणोरे या पाच कॉम्प्लेक्सवर नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई सुरु केली. त्यापैकी आरोग्य बिल्डिंग दत्तनगर या सदनिकाधारकांनी पाणीपट्टी कर नगरपंचायतीकडे भरणा केला आहे. उर्वरित सदनिकाधारकांनी कर भरला नसल्याने त्यांच्यावर पाणी कनेक्शन तोडण्याची कारवाई नगरपंचायतीने केली आहे.

नगरपंचायतीचा चालू पाणीपट्टी कर थकबाकी ७३ लाख ४३ हजार ६३१ रुपये तसेच मागील थकबाकी ६० लाख ९० हजार ३९३ रुपये असे एकूण १ कोटी ३४ लाख ३४ हजार ५४ रुपये. थकला आहे. सामान्य नागरिक पाणीपट्टी कर थोड्या फार प्रमाणात भरतात. मात्र, मोठे सदनिकाधारक पाणीपट्टी कर भरत नाहीत. काही सदनिकाधारकांकडे नगरपंचायतीची दहा वर्षाची पाणीपट्टी कर थकीत आहे. या सर्वांना नगरपंचायतीची मालमत्ता कर व पाणी कर भरण्याच्या नोटीसा दिल्या आहेत. हा कर न भरणाऱ्यांना नगरपंचायतीकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. तसेच थकबाकीदारांचे सदनिकेसमोर ढोल बजाव आंदोलन नगरपंचायतीकडून केले जाणार आहे. एवढेच नव्हे तर, जप्तीच्या नोटीस देऊन नगरपंचायत कारवाई करणार आहे.

> **माणगावमधील नागरी सुविधांच्या अपेक्षा धरणाऱ्या सुजाण नागरिकांनी नगरपंचायतीचा पाणीपट्टी कर व मालमत्ता कर वेळीत भरून नगरपंचायतीला सहकार्य करावे.**
> **–संतोष माळी, मुख्याधिकारी**

## डी.डी.पाटील यांचे निधन

**। खरोशी । वार्ताहर ।**

जिल्हा परिषदेचे माजी शिक्षणाधिकारी दिनकर दामोदर तथा डी डी पाटील यांचे वयाच्या ७० वर्षी हृदय विकाराच्या झटक्याने शुक्रवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्याच्यावर पेण येथील वैकुंठधाम स्मशानभुमित त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शेकडो नागरिक व शिक्षक बांधव उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले एक मुलगी नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी जिल्ह्यात अनेक शिक्षकांशी स्नेहभावाचे, मैत्रीपूर्ण संबंध जपलेत अशा भावना उपस्थित शिक्षक बांधवांनी व्यक्त केल्या. त्यांच्या अंत्यसंस्कारा करिता जिल्ह्यातील शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, माजी शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी विविध संस्थांचे प्रमुख नगरसेवक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



## डी.बी. म्हात्रे यांना आदर्श वस्ताद पुरस्कार



**। पनवेल । वार्ताहर ।**

वावंजे ग्रामपंचायत सरपंच आणि कुस्ती या खेळासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत डि. बी. म्हात्रे याना महाराष्ट्र भूषण गौरव आदर्श वस्ताद पुरस्कार-२०२३ प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा १५ मार्च रोजी आयोजित केला गेला होता. महाराष्ट्र भूषण गौरव आदर्श वस्ताद पुरस्कार-२०२३ मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

जय मल्हार फाऊंडेशन आणि जय मल्हार आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल या कुस्ती संकुलाच्या प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने कला, क्रीडा आणि सामाजिक अशा विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल जय मल्हार फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र भूषण गौरव पुरस्काराचे आयोजन करण्यात आलेले होते.

या पुरस्कारासाठी छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय कुस्ती संकुल तालमीचे मार्गदर्शक वस्ताद म्हात्रे यांनी कुस्ती या खेळासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, महाराष्ट्र भूषण गौरव आदर्श वस्ताद पुरस्कार प्रदान करण्यात आला. हनुमान आखाड्याचे वस्ताद गणेश दागंट यांच्या तसेच मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन जय मल्हार फाउंडेशन व जय मल्हार आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलाचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब धावडे (आदर्श वस्ताद) यांनी केले होते.

## जुनी पेन्शन योजनेसाठी निदर्शने



**। पनवेल । वार्ताहर ।**

तालुक्याती पंचायत समितीचे कार्यालयीन कर्मचारी त्याचबरोबर पनवेल ग्रामसेवक संघटनेच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, या प्रमुख मागणीसह शासन स्तरावर अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या इतर मागण्यांसाठी मंगळवार (ता.१४ ) बेमुदत संप पुकारला आहे. संपाचा पाचवा दिवस आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन, महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन यांच्यासह जिल्ह्यातील विविध कर्मचारी संघटना सहभागी झाल्या आहेत.

सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास जोरदार निदर्शने केली. याप्रसंगी नंदकिशोर भगत, रमेश तारेकर, सुदिन पाटील, राजश्री पाटील यांच्यासह अनेक सदस्यांनी निदर्शनांमध्ये सहभागी झाले होते. यावेळी कर्मचारी एकजुटीचा विजय असो, एकच मिशन जुनी पेन्शन अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

## अलिबागमध्ये क्रिडा महोत्सवाचा शुभारंभ

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

माणुसकी प्रतिष्ठान, रायगड प्रिमियम लिग, आणि सुरभी स्वयंसेवी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अलिबाग सांस्कृतिक कला व क्रीडा महोत्सवाचे शानदार उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन आर. सी. एफ.चे जनसंपर्क अधिकारी संतोष वझे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा परिषदेतील स्वच्छता दूत जयवंत गायकवाड, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, रायगड प्रिमियम लिगचे सचिव जयंत नाईक, सुरभी स्वयंसेवी संस्थेच्या अध्यक्ष सुप्रिया जेधे, शिक्षण समन्वयक सुधीर वारगे उपस्थित होते.



## सरन्यायाधीश चंद्रचूड यांना सोशल मीडिया ट्रेलपासून वाचवण्याचे आवाहन

**। अलिबाग । वर्षा मेहता ।**



१२ राज्यसभा सदस्यांच्या गटाने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सरन्यायाधीश डी. वाय. यांच्या विरोधात केलेल्या घाणेरड्या आणि दुःखदायक टिप्पण्यांसाठी महाराष्ट्रातील सत्ताधारी शिवसेना (शिंदे)-भाजप युतीच्या ट्रेल आर्मी, संभाव्यतः सहानुभूती विरुद्ध कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. चंद्रचूड. जे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे आणि सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीत आहे, अशा लोकांना सत्ताधारी प्रशासनाचा पाठिंबा असेल तरच असे घृणास्पद आचरण शक्य आहे, असे पत्र, १६ जानेवारी रोजी जाहीर केले परंतु शुक्रवारी जाहीर केले. हे पत्र काँग्रेस खा. विवेक तनखा यांच्या नावावर आहे. त्यावर काँग्रेस, शिवसेना (उद्धव),समाजवादी पक्ष आणि आम आदमी पक्षाच्या इतर ११ खासदारांच्याही सह्या आहेत. न्यायमूर्ती चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने एकनाथ शिंदे यांच्या मूळ शिवसेनेपासून फारकत घेतल्याने गेल्या वर्षी महाराष्ट्रातझालेल्यासरकार बदलामुळे उद्भवलेल्या मुद्द्यांचा निपटारा केल्याने हा ट्रेल हल्ला झाला. खासदारांच्या पत्रात कोणत्याही ट्रेलची कोणतीही विशिष्ट टिप्पणी उद्धृत केलेली नाही परंतु न्याय प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचे निर्लज्ज प्रकरण असा आरोप केला आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना, महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाच्या हितसंबंधांबद्दल सहानुभूती असलेल्या ट्रेल आर्मीने माननीय सरन्यायाधीशांच्या विरोधात हल्ला चढवला आहे. शब्द आणि सामग्री घाणेरडी खेदजनक आहे ज्याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लाखो दृश्ये मिळविली आहेत, पत्रात म्हटले आहे.




# एक दिवस शाळेसाठी

### चोरढे राजिप शाळेत पालकांचा स्तुत्य उपक्रम

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

शाळा सुंदर असावी, या उद्देशाने राजिप शाळा चोरढेतील विदयार्थ्यांच्या पालकवर्गानी शाळेचे बाहय रंग सुधारण्यासाठी एक दिवस शाळेसाठी स्त्युत्य उपक्रम राबवित श्रमदान केले. चोरढे राजिप मराठी शाळेत दि. ९ मार्च रोजी शाळेसाठी पालकांनी एकदिवसाचे श्रमदान केले, यावेळी एकूण ४६ पालक उपस्थित होते. यामध्ये मोरेश्वर दुकले, सुनील घाग, गंगाराम भोईर, कमलाकर घाग, प्रमिला घाग, सुरेश तांबडे, दिनेश घाग, प्रमोद चोरढेकर, परेश घाग, माधूरी शेडगे, द्रौपदी भोईर, स्वप्नाली घाग, लीना तांबडे, वैशाली घाग, अमिषा कोटकर, दिपाली शेडगे, महानंद पाटील, अश्विनी घाग, संतोष भोईर, उषा चोरढेकर, अलका चोरढेकर, निकिता डोलकर, भारती घाग, पाडुंरंग काजारे, मालती शेडगे, मनिषा चोरढेकर, उज्वला घाग, रजनी भोईर, निर्मला महाडिक, कांता घाग, सुषमा महाडिक, पायल महाडिक, शेवंती महाडिक, जयमाला महाडिक, नितेश घाग, हिरा भोईर, उषा सुभेदार, दिपाली अमलीकर, राखी भिकारी, मंथना काजारे, परशुराम चोरढेकर, आदी चोरढे, सावरोली व वेताळवाडी गावातील विद्यार्थी व पालकवर्ग उपस्थित होते.



यावेळी पालकांनी शाळेचे बाहय रंगरूप सुधारण्यासाठी रेंजगा टेम्पोमध्ये भरून आणणे, लादी बसवणे, रेतीची वाहतुक करणे, जमीनेचे सपाटीकरण करणे इत्यादी कामात श्रमदान केले. तत्पुर्वी सुरेश तांबडे, सुनिल घाग श्रीफळ वाढवून कामाचा श्रीगणेशा केला. या कामासाठी गंगाराम भोईर, दिनेश घाग, रवी यांनी शाळेसाठी अनेक वस्तू उपलब्ध करुन दिल्या. शाळेच्या पालकांच्या श्रमदानाचे स्तुत्य उपक्रमास मुरूड पंचायत समिती विस्तार अधिकारी सुनिल गवळी तसेच देवानंद गोगर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सुरेश तांबडे, संगिता भगत, विजय जाधव, देवानंद गोगर व राजेंद्र नाईक प्रतिभा वर्तक यांनी सुयोग्य नियोजन केले.

## क्रीडा महोत्सवाचे आयोजन

**मुरुड जंजिरा :** मुरुड नगरपरिषद शाळा क्रमांक एक मध्ये बालक पालक क्रीडा महोत्सव या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमास संजय गुंजाळ, पांडुरंग आरेकर, यशवंत सवाई, नंदकुमार आंबेतकर, दिनेश भोईर, बाबुलाल पाखरे, आदी मान्यवर उपस्थित होते. बालक पालक क्रीडा महोत्सवात विविध संपन्न होणाऱ्या खेळामध्ये मुलांबरोबर त्यांचे पालक सुद्धा सहभागी होत असतात. पालक आल्याने मुलांमधला आत्मविश्वास द्विगुणित होऊन खूप चांगल्या पद्धतीने मुलांनी विविध खेळात आपले कौशल्य दाखवले.

### नात्यातील वीण घट्ट करण्याचा आरसीएफ शाळेचा प्रयत्न

# आजी-आजोबा रमले नातवंडांच्या शाळेत

*। अलिबाग । प्रतिनिधी ।*

*वार्षिक स्नेहसंमेलन असो किंवा अन्य कोणतेही कार्यक्रम. विद्यार्थ्यांचे पालक नेहमीच शाळेत येतात. शाळेतले विश्व बहुतांशी आई-बाबा, शिक्षक, विद्यार्थी यांच्याभोवतीच फिरत असते. आजी-आजोबांचा नातवंडांच्या शाळेशी तसा संबंध येत नाही. मात्र, आजी-आजोबांनाही आपल्या नातवंडांच्या शाळेचे आकर्षण असते. नातवंडे आणि आजी-आजोबा हे जिव्हाळ्याचे नातं लक्षात घेत त्यांना शाळेत खास आमंत्रित केले होते. त्यांच्यासाठी त्यांच्याच नातवंडांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. निमित्त होते आजी-आजोबा दिवसाचे.*

अलिबाग तालुक्यातील नुकताच आरसीएफ प्राथमिक आणि पूर्व प्राथमिक शाळेत 'आजी आजोबा' दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवानाने झाली. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका मंगला विसावे यांनी विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांचे स्वागत केले. तसेच आपल्या पाल्याच्या सर्वांगीण विकासाकरिता आमचे विद्यालय कटिबद्ध आहे, असा विश्वास व्यक्त करुन त्यांच्या प्रगतीत आजी-आजोबा देत असलेल्या योगदानाबद्दल त्यांचेसुद्धा अभिनंदन केले. आजी-आजोबांसाठी नातवंडे म्हणजे एक प्रकारचे टॉनिक असून, नातवंडेसुद्धा आजी-आजोबांच्या ऊबदार मायेत फार आनंदी असतात. त्यांच्यावर नकळत चांगले संस्कार घडतात याचे महत्त्व त्यांनी थोडक्यात सांगितले. मदर्स डे, फादर्स डे जगभर साजरा केला जातो. परंतु, आजी-आजोबांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी तशी मिळत नाही. पण, आरसीएफ प्राथमिक आणि पूर्व प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी आजचा दिवस त्यांच्या आजी-आजोबांसाठी अविस्मरणीय केला, असेही त्या म्हणाल्या.



> आपल्या देशाचे उत्तम नागरिक हे आजी-आजोबा घडवत आहेत, आजी-आजोबा ही एकत्र कुटुंबातील अडचण नसून, तो एक आधारवड आहे. नातवंडांना संस्कारधन सुपूर्द करताना आजी-आजोबांच्या कृतार्थतेचा अनुभव येतो. नातवंडांच्या प्रेमाने आनंदाचा ठेवा मिळतो.
> - मंगला विसावे, मुख्याध्यापिका

सदर कार्यक्रमात वेगवेगळ्या गाण्यांवर कोणी नृत्य सादर केले, तर कोणी आपल्या आजी-आजोबांविषयीच्या आठवणींना मनोगतातून उजाळा दिला. आजी-आजोबा आणि नातवंडे या नात्यावर बेतलेली जुनी गाणी, कविताही विद्यार्थ्यांनी सादर केल्या. यावेळी आजी-आजोबा नातवंडांसह विविध खेळ खेळले. मुले लहान असताना ती आमच्यासोबत असतात, एकदा शाळेत जायला लागली की, त्यांचे वेगळे विश्व तयार होते. पण, या त्यांच्या विश्वात त्यांनी आज आम्हालाही सामावून घेतले, याचा खरंच खूप आनंद झाला, हा उपक्रम कौतुकास्पद आहे. कधी गंमत, मस्ती तर कधी भावनिक क्षणांच्या हा कार्यक्रमामुळे आमच्या आणि नातवंडांमधील नात्याची वीण अधिकच घट्ट झाली, अशा शब्दांत आजी-आजोबांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल शाळेला धन्यवाद देत, असे कार्यक्रम पुनः पुन्हा आयोजित करावेत, अशी सदिच्छा व्यक्त केली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राची पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. शेवटी रेश्मा साळावकर यांनी आभार व्यक्त केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)